दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२०८ | मंगळवार दि.२५ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महायुतीची बिनविरोध मॅचफिक्सिंगची नवी राजकीय लीग!

महाराष्ट्रात लोकशाहीची वाटचाल आता वेगळ्याच वळणावर येऊन ठेपली आहे. निवडणुका म्हणजे मतदारांचा उत्सव आहे, असं आपण पुस्तकात वाचतो, भाषणात ऐकतो. पण प्रत्यक्षात? सत्तेच्या गल्लीबोळात निवडणुका आता केवळ औपचारिकता राहिल्या आहेत. स्पर्धा नाही, विचार नाही, परीक्षा नाही फक्त 'मॅचफिक्सिंग'चा झगमगता खेळ! आणि हा खेळ महायुतीने इतक्या 'व्यवस्थित' पद्धतीने आखला आहे की लोकशाहीचा प्राणवायूच गुदमरतोय.

# महाडीबीटी पोर्टल ठप्प !

## अनेक योजनांचे अनुदान रखडले; शेतकरी अडचणीत

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी कार्यरत असलेले महाडीबीटी पोर्टल काही दिवसांपासून बंद पडले आहे. शेतकऱ्यांची महाडीबीटीवरील अनेक कामे खोळंबली आहेत. नवीन अर्ज करणे, योजनेचे पेमेंट करणे, सद्यस्थिती तपासणे आदी कामे रखडल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.**




शेतकऱ्यांसाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे पोर्टल आहे. शेतकरी कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी (उदा. कृषी यांत्रिकीकरण) ऑनलाइन नोंदणी करून अर्ज करू शकतात आणि अनुदानाची प्रक्रिया येथूनच केली जाते. मात्र सध्या या पोर्टलचे सर्व्हर डाऊन असल्याचे समोर आले आहे. अनेक शेतकऱ्यांनी झटका मशीन, सोलर मशीन आणि इतर योजनाचा फायदा घेण्यासाठी अर्ज केले आहेत, मात्र पोर्टलचं बंद असल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित माहिती मिळत नसल्याचे दिसत आहे. मागील काही दिवसांपासून महाडीबीटी पोर्टल ठप्प आहे. अर्ज भरताना त्रुटी, सबमिट न होणारे अर्ज, सर्व्हर डाउन यामुळे अनेक अर्ज ▶▶ पान २ वर

## प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेची नवीन यादी जाहीर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत सरकारने प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण २०२५ ची अद्ययावत लाभार्थी यादी अधिकृतपणे जाहीर केली आहे. ही योजना ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंतर्गत २०१६ मध्ये सुरू झाली होती आणि यापूर्वी ती इंदिरा आवास योजना म्हणून ओळखली जात होती.**

या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना पक्की (स्थायी) घरे उपलब्ध करून देणे आहे. या घरांच्या बांधकामासाठी सरकार मैदानी भागांमध्ये १.२ लाख तर डोंगराळ प्रदेशात १.३ लाख पर्यंतची मदत देते. पीआयबीनुसार, योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत ३ कोटींहून अधिक घरांना मंजुरी देण्यात आली आहे. सर्वांसाठी घरे हा उद्देश पूर्ण करण्यासाठी सरकारचे २०२९ पर्यंत २.९५ कोटी अतिरिक्त घरे बांधण्याचे लक्ष्य आहे. पहिल्या यादीनंतर एका महिन्याच्या आत दुसरी यादी जाहीर केली जाईल. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तिजोरीची चावी माझ्या हाती-अजित पवार

लोहा : शहराच्या विकासासाठी आमदार प्रताप पाटील चिखलीकर प्रयत्नशील असतात. त्यांच्या नेतृत्वाखालील विकासाची जाणीव असणारे नगराध्यक्ष पदाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार यांना निवडून द्या. मी पूर्ण ताकदीनिशी तुमच्या पाठीशी उभा आहे. शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी (दि. २४) येथे दिले. लोहा नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारसभेत ते बोलत होते. या शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही. राज्याच्या तिजोरीची चावी आपल्या हाती आहे. उमेदवारांना निवडून द्यायचे आहे. कोणत्याही मूलथापांना बळी पडू नका, आपल्या शहराच्या विकासासाठी लागेल तेवढा निधी दिला जाईल, असे अजित पवार म्हणाले.

### एआयचा गैरवापर चिंताजनक - मोदी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) गैरवापर रोखण्यासाठी जागतिक समझोता आवश्यक आहे. डीपफेक आणि दहशतवादातही एआयचा गैरवापर सुरू आहे. याबद्दल चिंता व्यक्त करीत तंत्रज्ञान हे अर्थकेंद्रीत नव्हे तर मानवी केंद्रीत असायला हवे. यातून जर त्याचा गैरवापर होत असेल तर तो रोखला पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी भारत फेब्रुवारी २०२६ मध्ये एआय इम्पॅक्ट शिखर संमेलनाचे आयोजन करेल, असे म्हटले. जी-२० शिखर संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते. डीपफेक आणि दहशतवादात एआयच्या वापरावर बंदी आणली पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर राष्ट्रीय ऐवजी वैश्विक पातळीवर झाला पाहिजे.

### सोन्याचे दर आणखी वाढणार!

नवी दिल्लीः जागतिक बाजारपेठेत अस्थिरता असतानाही सोन्याची चमक कायम आहे. पुढील काही महिन्यांत सोन्याचे भाव वाढतच राहतील, असा महत्त्वाचा अंदाज एचएसबीसी बँकेने आपल्या ताज्या अहवालात वर्तवला आहे. थिंक फ्युचर २०२६ नावाच्या या अहवालात म्हटले आहे की, जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या काळात सोन्याचा उपयोग एक शक्तीशाली संरक्षक म्हणून होतो आणि त्यामुळेच मध्यवर्ती बँका तसेच किरकोळ गुंतवणूकदार या दोघांकडूनही सोने मोठ्या प्रमाणात खरेदी केले जात आहे. एचएसबीसीनुसार, यावर्षी सोन्याची दरवाढ जवळपास ५० वर्षांतील सर्वोत्तम ठरू शकते. या वर्षात आतापर्यंत सोन्याच्या किमतीत सुमारे ५४% वाढ झाली आहे.

### गेल्या ३ वर्षातील अपघात स्फोटांची पुन्हा चौकशी होणार?

मुंबई : दिल्लीतील कार स्फोटाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र पोलीस गेल्या तीन वर्षात झालेल्या मोठ्या अपघात, आगी, स्फोट, रसायन आणि सिलेंडर स्फोटांची पुन्हा चौकशी करणार आहेत. जे अपघात म्हणून दाखवले गेले त्या घटनांमध्ये राष्ट्रविरोधी किंवा दहशतवादी घटकांचा सहभाग होता का, हे पोलीस तपासणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्र पोलिसांनी सर्व शहरांच्या पोलीस आयुक्तांसह पोलीस अधीक्षकांना हे निर्देश दिले आहेत. लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला होता. या स्फोटानंतर श्रीनगर पोलिसांनी व्हाइट कॉलर मॉड्यूलचा पर्दाफाश केल्यानंतर सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर आल्या आहेत.

# बॉलिवूडच्या ही-मॅनची एक्झिट !

## अभिनेते धर्मेंद्र यांचं निधन; वयाच्या ८९ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



मुंबई । प्रतिनिधी

सोमवारचा दिवस बॉलिवूडसाठी काळा दिवस ठरला. लोकप्रिय अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले. राहत्या घरी त्यांनी सोमवरी २४ नोव्हेंबर रोजी सकाळी धर्मेंद्र यांनी आपल्या चाहत्यांची साथ कायमची सोडली. बॉलिवूडचा ही- मॅन प्रेक्षकांना सोडून गेला. ते गेले काही दिवस व्हेंटिलेटरवर देखील होते. त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होते. पत्नी प्रकाश कौर यांच्या सांगण्यावरून त्यांना घरी हलवण्यात आले होते. मात्र ८९ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. धर्मेंद्र यांच्या पार्थिव देहावर विले पार्ले येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बॉलीवूड सिताऱ्यांसह त्यांचे कुटुंबीय आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

काही दिवसांपूर्वीदेखील ३१ ऑक्टोबर रोजी त्यांना मुंबईच्या ब्रीच कँडी इस्पितळात दाखल करण्यात आले होते. मात्र तेव्हा फक्त त्यांना चेकअप करून पुन्हा घरी सोडण्यात आले होते. ▶▶ पान २ वर

# सांगायचे काम माझे बटन दाबायचे काम तुमचे-अजित पवार



बीड । प्रतिनिधी

**माझ्याकडे काही जादूची कांडी नाही मी हळूहळू विकास करतोय जनतेने संधी दिली तर संधीच सोनं करायचं की राग करायची हे तुमच्या हातात पूर्ण नगरपालिका ताब्यात द्या विकासाचे काम करून दाखवतो सांगायचे काम माझे आहे बटन दाबायचे काम तुमचे आहे असे उपमुख्यमंत्री अजित पवार बीड येथील सभेत बोलले**

आज बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दोन सभा झाल्या यामध्ये बोलताना अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवाराला विजयी करण्याचे आवाहन केले आजपर्यंत शासनाने बळीराजाला मदत केली लाडक्या बहिणींना मदत केली शेतकऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात मदत केली शेतकरी मोडला तर राज्य मॉडेल त्यामुळे शेतकरी जगला पाहिजे शेतकरी ही माझी जात आहे यावरच आपण काम करतो असे नमूद करताना राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष सहभावन नगरसेवक निवडून द्या आणखी ▶▶ पान २ वर

### नाव न घेता क्षीरसागरांना घेतले चिमटे

अजित पवार यांनी आपल्या भाषणामध्ये योगेश क्षीरसागर डॉक्टर भारत भूषण क्षीरसागर जयदत्त क्षीरसागर यांचे नाव न घेता चांगले चिमटे काढले गेले अनेक वर्ष तुमच्याकडे तुमच्या वडीलाकडे तुमच्या चुलत्याकडे सत्ता होती मग विकास का केला नाही असा टोला लगावला यासोबतच सर्व एबी फॉर्म माझ्याकडे द्या असे म्हणत होते तुम्ही म्हणजे पक्षाचे मालक नाहीत मला सर्वांना सांभाळून घेऊन पक्ष चालवायचा असे देखील अजित पवार म्हणाले

# माझ्या छातीवर वर्षभरात असंख्य वार झाले-धनंजय मुंडे



परळी । प्रतिनिधी

आजपर्यंत आम्ही कधीच कमी पडलो नाही. परळीच्या विकासाबाबत आमचे एक व्हिजन आहे. आता समोरच्यांचे व्हिजन काय असेल? समोरच्याचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचे व्हिजन काय असेल? अचानक निवडणूक लागायच्या आधीच माणूस बिचकला. तसेच तुतारी घेऊनच आला. मला त्याबद्दल बोलायचे नाही. पण असे वार माझ्या जीवनात अनेकांनी केले, अशी खंत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे माजी मंत्री ▶▶ पान २ वर

# मत आणि निधीबाबत विधानावर मुख्यमंत्री फडणवीसांकडून अजित पवारांची पाठराखण

मुंबई । प्रतिनिधी

माळेगाव नगरपंचायतीत आमच्या विचारांचे १८ उमेदवार निवडून द्या. मी सांगितलेले सगळे करीन; पण, तुम्ही जर काट मारली, तर मीही काट मारणार. तुमच्या हातात मताचा अधिकार आहे, तर माझ्या हातात निधीचा अधिकार आहे, आता बघा काय करायचड ते, असा थेट आणि सूचक इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी



दिला. यावरून विरोधकांनी अजित पवार यांच्यावर टीका केली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री म्हणून मी एवढेच सांगतो की, संपूर्ण राज्याचा विकास आम्हाला करायचा आहे. सर्व भागाचा विकास करायचा आहे.

निवडणुकीनंतर सगळ्या शहरांचा विकास आम्हाला करायचा आहे. अनेकवेळा भाषणात काही गोष्टी आपण बोलतो. त्याचा अर्थ तसा कधीच नसतो. आमचे सहकारी किंवा कोणी असे बोलले असले, तरी त्यांचा उद्देश तसा नाही. तेही असा भेदभाव कधी करणार नाहीत. निश्चितपणे महाराष्ट्रात आमच्या महायुतीला जनता निवडून देईल. त्यानंतर महाराष्ट्राचा, नागरी भागाचा चांगला विकास आम्ही करू अशी ग्वाही ▶▶ पान २ वर

# महिला कबड्डी संघ ठरला जगतज्जेता

ढाका । वृतसंस्था

वूमन्स टीम इंडिया हरमनप्रीत कौर हीच्या नेतृत्वात वर्ल्ड चॅम्पियन ठरली. भारताने अवघ्या काही दिवसांआधी अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत वनडे वर्ल्ड कप ट्रॉफीवर नाव कोरले होते. त्यानंतर रविवारी २३ नोव्हेंबरला भारतीय महिला दृष्टीहीन संघाने इतिहास घडवला. दृष्टीहीन क्रिकेट संघाने नेपाळवर मात करत वर्ल्ड कप मिळवला. त्यानंतर आता क्रीडा विश्वातून मोठी बातमी समोर आली आहे.

वूमन्स कबड्डी टीम इंडियाने अंतिम सामन्यात चीन तायपे संघाचा धुव्वा उडवला आहे. भारताने अंतिम सामन्यात ३५-२८ अशा फरकाने विजय मिळवत वर्ल्ड कप विजेता होण्याचा बहुमान मिळवला आहे. विशेष म्हणजे कबड्डी वूमन्स टीम इंडियाची ▶▶ पान २ वर

# ठाकरे बंधूंचे निवडणूक आयुक्तांना पत्र ; दाखवल्या ६ ठळक चुका



मुंबई । प्रतिनिधी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरुवात झाली असून येत्या २ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. त्यानंतर, जानेवारी महिन्यात राज्यातील मुंबईसह सर्वच महापालिकांच्या निवडणुका होण्याची ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६५.०० क्विंटल | २,३०० | ३,००० | २,६६८ |
| ज्वारी/हायब्रिड: १०५.५० क्विंटल | २,३९० | ३,४९९ | ३,०११ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : २३.५० क्विंटल | ४,४०१ | ५,३५१ | ४,९६० |
| बाजरी:५६.५० क्विंटल | २,३८० | ३,३३५ | २,७५९ |
| मुगः ४.५० क्विंटल | ४,५०० | ६,८०० | ५,३२५ |
| सोयाबीनः २७५.०० क्विंटल | १,६७५ | ४,७०० | ४,३८९ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |


# मतदानादिवशी मोठी लग्नतिथी मतदानाचा टक्का घसरणार ?

## 'प्रथम मतदान, नंतर मंगलकार्य' या भुमिकेची गरज

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात नगरपालिकांमध्ये नगराध्यक्षपदांसह जागांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मात्र, याच दिवशी विवाहासाठी देखील शुभमुहूर्त असल्याने अनेक कुटुंबे विवाहसोहळ्यांच्या तयारीत गुंतणार आहेत. परिणामी, मतदार केंद्राकडे वळणार की लग्नसमारंभांकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे. लग्नाच्या शुभमुहुर्तामुळे मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.**

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव म्हणून मतदानाकडे बघितले जाते. ते आपले महत्त्वाचे कर्तव्य आहे. नागरिकांनी प्रथम मतदानाचे कर्तव्य पार पाडून त्यानंतरच विवाहसोहळ्यांकडे वळावे. या संदेशांसह व्यापक जनजागृती मोहीम सुरू करण्याची गरज व्यक्त होत आहे. त्यामुळे २ डिसेंबर ही तारीख एकाचवेळी लोकशाही आणि परंपरेची कसोटी ठरणार आहे. मतदान टाळल्यास उमेदवार निवड आणि लोकशाहीच्या ▶▶ पान २ वर



# न्यायमूर्ती सूर्यकांत सरन्यायाधीशपदी शपथबद्ध

नवी दिल्ली । वृतसंस्था

**न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सोमवारी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती कांत यांना शपथ दिली. शपथविधी सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल या समारंभास उपस्थित होते.**



विद्यमान सरन्यायाधीश बी.आर. गवई यांचा कार्यकाळ रविवार, २३ नोव्हेंबर रोजी संपला. आता देशाचे ५३ वे सरन्यायाधीश ठरलेल्या सूर्य कांत यांचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत असणार आहे. शपथविधीनंतर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती भवनात उपस्थित असलेल्या इतरांची भेट घेतली. तसेच माजी सरन्यायाधीश बी.आर. गवई यांना ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# महायुतीची बिनविरोध मॅचफिक्सिंगची नवी राजकीय लीग !

महाराष्ट्रात लोकशाहीची वाटचाल आता वेगळ्याच वळणावर येऊन ठेपली आहे. निवडणुका म्हणजे मतदारांचा उत्सव आहे, असं आपण पुस्तकात वाचतो, भाषणात ऐकतो. पण प्रत्यक्षात? सत्तेच्या गल्लीबोळात निवडणुका आता केवळ औपचारिकता राहिल्या आहेत. स्पर्धा नाही, विचार नाही, परीक्षा नाही फक्त 'मॅचफिक्सिंग'चा झगमगता खेळ! आणि हा खेळ महायुतीने इतक्या 'व्यवस्थित' पद्धतीने आखला आहे की लोकशाहीचा प्राणवायूच गुदमरतोय.

केंद्रात '४०० पार'चा बुलंद नारा देत प्रवेश केलेल्या सत्ताधाऱ्यांना काठावर टिकलेलं सत्तास्थान पुरेसं नव्हतं. म्हणूनच महाराष्ट्रात 'लाडकी बहिण' योजनेच्या मोहजालात मतदारांना अडकवण्यात आलं. बिहारमध्ये तर महिलांना तब्बल दहा हजार रुपयांचा गोंडस फास टाकून सत्ता मिळवली. आता स्थानिक स्वराज्य निवडणुकांत हा 'फॉर्म्युला' आणखी विकसित करून बिनविरोधांची नवी परंपरा निर्माण केली जात आहे. काही ठिकाणी उमेदवार जाहीरही झाले तेही कोण? सामान्य माणूस नाही, तर धनदांडगे, प्रभावशाली आणि 'पार्टी हिताचे' निष्ठावंतच आहेत, असे म्हटले वावगे ठरणार नाही.

खरं तर, अशी निवडणूक म्हणजे लोकतंत्राची थट्टाच सुरू झाले आहे का, निवडणूक उभी करायची, पण स्पर्धा उभी नको, मतदार ठेवायचा, पण मताचा अधिकार द्यायचा नाही आणि उमेदवार ठेवायचा, पण जनतेचा नव्हे तर सत्तेचा अशीच काहीशी स्थिती निर्माण झाली आहे. हे सगळं इतक्या निर्धास्तपणे सुरू असून, नागरिकांकडून सरळसरळ उघडपणे विचारले जात आहे. त्यामुळे अशा पद्धतीने राजकारण करायचे असेल तर निवडणुका कशाला घेता असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. या सगळ्याला जबाबदार फक्त सत्ताधारीच नव्हेत. लोकशाहीचा मेंदू विसरणारा समाजही तितकाच दोषी आहे. २०२४ मध्ये काही रुपयांच्या लालुचाला बळी पडलेला मतदार आजही आपल्या निर्णयाच्या चुकांचं गांभीर्य समजून घेत नाही. विचारशक्तीची झोप, वचनांची नशा आणि सत्तेच्या ब्रँडिंगने जनतेला आपल्याच अधिकारांपासून दूर नेलं आहे. लोकशाही म्हणजे केवळ मतदान नव्हे; लोकशाही म्हणजे सत्ता प्रश्नांकित ठेवण्याची क्षमता. ती क्षमता हरवल्यावर उरते ती केवळ बाहुल्यांची प्रणाली म्हणावे लागत आहे.

राज्यातील बिनविरोधांची मालिका ही काही सहकार्याची खूण नाही, तर सत्तेच्या शक्तीसमोर विरोधकांचे कोलमडलेले मनोबल आणि पैशांच्या राजकारणाची उघडपणे जगजाहीर कबुली आहे. लोकशाहीची शर्यत सुरू होण्याआधीच निकाल ठरवणारा हा काळा अध्याय महाराष्ट्राच्या इतिहासात नोंदला जात आहे. प्रश्न असा आहे की, जनता अजून किती काळ या खेळाची प्रेक्षक राहणार? लोकशाहीला ऑक्सिजन देणारी शक्ती म्हणजे जागरूक जनता. आणि तीच जनता जर मेंदू बंद करून बसली तर बिनविरोधांचे हे 'राजकारण 'पुढे आणखी विक्राळ रूप धारण करेल, अशी भीती निर्माण होत आहे. लोकशाही वाचवायची असेल तर प्रश्नांची तलवार धारदार हवी, आणि जागृतीचा आवाज आणखी कडक झाला पाहिजे. सत्ता कोणाचीही असो, तिच्यावर नियंत्रण ठेवणारे आपण मतदार आहोत, याचे प्रत्येकाने भान राखले पाहिजे.

## दिंद्रुडचा आठवडी बाजार आहे त्याच जागेवरच भरणार, ग्रामपंचायतचे पत्रक

दिंद्रुड । प्रतिनिधी

शेकडो वर्षापासून भरणाऱ्या दिंद्रुड येथील निजामकालीन बाजारात शनिवारी रात्री उशिरा अज्ञात व्यक्तीने न्यायालयाचा आदेश या मथळ्याखाली येथे बाजार भरू नये अशा आशयाचे बॅनर लावले. रविवारी सकाळी हा खोडसाळपणा लक्षात आल्यानंतर गावकऱ्यांनी व्यापाऱ्यांना धीर देत बाजार सुरू करण्यास सांगितले. सदरील बाजाराची जागा ही ग्रामपंचायतच्या ताब्यात असून याच क्षेत्रात बाजार भरवला जात असल्यामुळे व्यापार्यांनी भयभीत न होता व्यापार करावा असे ग्रामपंचायतने पत्रक काढत व्यापाऱ्यांना दिलासा दिला.

पंचक्रोशीतील अनेक गावातील शेतकरी आपला भाजीपाला व धान्य विक्रीसाठी आणतात.अनेकजण कपडा, सोने-चांदी, मसाले, किराणा, फळे, खाऊ ची दुकाने आदींच्या माध्यमातून येथे व्यापार व लाखो करोडोंची उलाढाल करतात. मात्र मागच्या काही दिवसांपासून सदरील जागा वक्फ बोर्डाची असल्याचा दावा करण्यात आला आहे. सदरील प्रकरण छत्रपती संभाजीनगर खंडपीठात न्यायप्रविष्ठ असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने शनिवारी रात्री उशिरा आठवडी बाजार परिसरात न्यायालयाचे आदेश या मथळ्याखाली बॅनर लावले. ज्यावर येथील सर्व्हे नंबर १४/ गट नंबर ७३१ मधील एकूण तीन एकर जमिनीवर दुकाने लावण्यास व बाजार भरवण्यास महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायालयाने पारित केलेले मनाई हुकमाचे आदेश दि.७/११/२०२५ चे असल्याने दुकाने व बाजार भरवू नये. असे नमूद करण्यात आले होते. सकाळी हे बॅनर पाहिल्यानंतर व्यापारी व गावकरी अचंबित झाले. मात्र गावकऱ्यांनी ताबडतोब व्यापाऱ्यांना धीर देत त्यांना आपापली दुकाने लावण्या सांगितली. सदरील बाजारावर हजारो छोट्या-मोठ्या गोरगरीब व्यापाऱ्यांची उपजीविका असल्यामुळे या बाजारावर वक्रदृष्टी करणाऱ्यांबद्दल प्रचंड संताप व्यक्त होत आहे. मागील शेकडो वर्षापासून बाजार भरत६७ आर ही जागा ग्रामपंचायतीच्या ताब्यात असल्यामुळे या ठिकाणी बाजार भरवण्यास प्रतिबंध करण्याचा कोणालाही अधिकार नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांनी भयभीत न होता व्यापार करावा अशा आशयाचे पत्रक ग्रामपंचायत च्या वतीने रविवारी लावण्यात आले. शेकडो वर्षापासून भरणाऱ्या आठवडी बाजारात बॅनर लावून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम कोण करत आहे? याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## शिवसेना राष्ट्रवादी कार्याकत्यांचा भाजपात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

**शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात प्रभाग क्र.९ मधील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख राजू महुवाले, प्रभाग क्र.१ मधील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सुरेश शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि.२४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. तसेच, संत सावता क्रांती परिषदेसह दशनाम गोसावी समाजाने एकमुखी पाठिंबा दिला आहे. या प्रवेशासह संघटनांच्या पाठिंबामुळे बीडमधील भाजपाची ताकद आणखी वाढली आहे.**



भाजपच्या पक्ष कार्यालयातील प्रवेश कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तांदळे, भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे, शहराध्यक्ष अशोक लोढा, प्रा.देविदास नागरगोजे, रवींद्र कदम, चंद्रकांत फड, सुनील मिसाळ, गणेश लांडे, बालाजी पवार, डॉ.लक्ष्मण जाधव, भूषण पवार, डॉ.अभय वनवे, डॉ.रमेश शिंदे, अक्षय रणखांब, नगरसेवक पदाचे उमेदवार परमेश्वर धारकर, दत्ता गायकवाड, मुकेश कुटे, महादेव नागरगोजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपमध्ये झालेला हा प्रवेश आगामी निवडणूक प्रचाराला चालना देणारा ठरणार आहे. भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घुमरे यांना आमदार योगेशअण्णा टिळेकर यांच्या संत सावता क्रांती परिषदेच्यावतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. पाठिंब्याचे पत्र परिषदेच्यावतीने सागर पाटील व पदाधिकाऱ्यांनी दिले आहे. दरम्यान, पाठिंबा दिल्याबद्दल डॉ.ज्योती घुंबरे यांच्यासह भाजपच्यावतीने परिषदेचे आभार मानले आहेत. बीडमधील खासबाग देवी मंदिराचे ज्येष्ठ पुजारी दिवंगत दिगंबर विठ्ठल गिरी यांच्या तेरवीप्रित्यर्थ बीडमधील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित कार्यक्रमानिमित्त डॉ.ज्योतीताई घुंबरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी दशनाम गोसावी समाजाच्या समाधी भूमीच्या प्रलंबित प्रश्नाची माहिती जाणून घेतली. बीड जिल्ह्यातील गोसावी समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न असून तो मार्गी लावण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, असे त्यांनी आश्वासन दिले. या भेटीवेळी दशनाम गोसावी समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, भाजप युवा नेते बालाजी पवार, दादासाहेब ननवरे, ॲड.जयश्री ढाकणे, गोसावी समाजाचे पदाधिकारी विश्वंभर गिरी, सिद्धेश्वर गिरी, विवेकानंद गिरी, उत्तरेश्वर भारती, मंदिर पुजारी मच्छिंद्र बन, मारुती गिरी, बबन गिरी यांसह बीड शहरातील गोसावी समाजाचे सदस्य उपस्थित होते.

## महिलांनी सामाजिक कार्यासाठी एकत्र यावे -अनिता काळे

### राज्यस्तरीय 'महाराष्ट्र समाज भूषण' पुरस्काराने विविध क्षेत्रातील महिला सन्मानित



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याने सृष्टी बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेने विविध क्षेत्रात कार्यरत महिलांना 'राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५' सन्मान सोहळा पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात संपन्न झाला.**

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, त्यागमूर्ती रमाई आंबेडकर, माई सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमांसमोर पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा सौ. मिनाक्षी डोंगरे यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता बारवकर यांचे स्वागत केले.अनिता काळे, सौ. संगीता शिंदे, सुवर्णा इंगोले, मीरा पाटील, सौ. नंदा डेरे, डॉ. सुजाता कोठाळे या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. संस्थेचे प्रस्ताविक कु. श्रेया साळवे यांनी मांडले.

डॉ. स्मिता बारवकर यांनी 'महिलांनी वाचन करून प्रगल्भ विचार अवलंबून सक्षम व्हावे' असा आवाहन केले तर सुवर्णा इंगोले यांनी स्त्रियांना विकासाच्या समान संधी मिळणे गरजेचे असून, स्त्रियांवरील मानसिक आणि शारीरिक अत्याचारांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला. सौ. नंदा डेरे यांनी 'स्त्री ही चैतन्यशक्ती आहे, आपण स्त्रियांना लक्ष्मी मानतो' असे मत मांडले.अध्यक्षीय भाषणात अनिता काळे यांनी 'महिलांनी आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी चांगली जीवनशैली अंगिकारली पाहिजे. महिला म्हणजे कुटुंबाचा कणा आहे. महिलांनी सामाजिक कार्य करण्यासाठी एकत्र आले पाहिजे' असा संदेश दिला.या निमित्ताने विविध क्षेत्रात कार्यरत अनेक महिलांना 'राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षी डोंगरे, उपाध्यक्षा माधुरी साळवे, सचिव भारती एकलारे, संचालक मंडळ सदस्य विकास डोंगरे व अनिल चाटे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री पुरंदरे व चेतना शर्मा यांनी केले. अखेरीस चेतना शर्मा यांनी उपस्थित सन्मानित पाहुणे आणि पुरस्कारविजेत्यांचे आभार मानले.

## बीडमध्ये टीईटी परीक्षेचा पहिला बळी!

### टीईटी परीक्षेच्या तणावातून बीड मध्ये शिक्षक आत्महत्या; बीडच्या शिक्षण क्षेत्रात शोककळा

बीड । प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील कोल्हारवाडी येथील श्री शहागीर बाबा शाळेत कार्यरत असलेले शिक्षक राजाराम बाजीराव वळे यांनी शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी संबंधित वाढत्या तणावामुळे आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून शिक्षकवर्गात शोककळा पसरली आहे.**



राजाराम वळे नावाचे शिक्षक हे बीड तालुक्यातील कोल्हारवाडी येथील श्री शहागीर बाबा या शाळेमध्ये २२ - २३ वर्षापासून शिक्षक म्हणून कार्यरत होते. विद्यार्थ्यांमध्ये ते शांत, प्रेमळ आणि मार्गदर्शन करणारे शिक्षक म्हणून ओळखले जात. ते मागील काही दिवसांपासून टीईटी परीक्षेच्या तयारीत व्यस्त होते आणि सतत तणावाखाली होते. या तणावातूनच त्यांनी टीईटी परीक्षेच्या दिवशी म्हणजेच रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या घरच्यांना घटनेनेची तीन वाजण्याच्या सुमारास ही घटना माहिती झाली. सदर घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला होता. सोमवार दिनांक २४ रोजी सकाळी त्यांच्या पार्थिवावर बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पाठीमागे असलेल्या स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून शिक्षकवर्गात शोककळा पसरली आहे. या प्रकरणाची बीड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## पान १ वरून...

### प्रधानमंत्री ग्रामीण आवास

ज्यांचे नाव पहिल्या यादीत आले नाही, त्यांना पुन्हा समाविष्ट होण्याची संधी मिळेल. यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये घरोघरी जाऊन नवीन सर्वेक्षणे केली जात आहेत. याचा उद्देश पारदर्शकता वाढवणे आणि वंचित आणि दुर्बळ घटकातील कुटुंबांना योजनेत समाविष्ट करणे हा आहे.

-------------

### महाडीबीटी पोर्टल ठप्प !

प्रलंबित आहेत. नवीन अर्ज करता येत नाहीत, परिणामी योजना प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी पंगु ठरली आहे. एक वर्ष लोटले, खरिपाचा हंगामही गेला. पण अनुदान अजून मिळाले नाही. पोर्टलची तांत्रिक अडचण प्रशासनाने लवकरात लवकर सोडवावी. अनेक दिवसांपासून पोर्टल बंद आहे. दहा महिन्यांपासून पेमेंट पेंडिंग आहे. नवीन लाभार्थ्यांना अर्जही करता येत नाही. काही गावं अजूनही योजनेत नाहीत. अशा अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. यासाठी यावर शासनाने तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.

-------------

### सांगायचे काम माझे बटन

राहिलेला विकास करतो मी पालकमंत्री असल्यानंतरच विकास कामाला सुरुवात झाली ही तुम्ही पाहत आहात गिरी अनेक वर्ष कोणाच्या ताब्यात नगरपालिका होती त्यांनी काय केले हे तुम्हाला ठाऊकच आहे मी आता धारूर माजलगाव बीड या ठिकाणी देखील सभा घेणार आहे मी तुमचं भलं करायला आलो आहे जो काम करतो तो चुकतो चुकला तर सांगा दुरुस्त करायला देखील मी तयार आहे पण काम करणारा चुकतो असे नमूद करताना त्यांनी मी आवाहन करतो माझे सांगायचे काम आहे बटन दाबायचे तुमचे काम आहे असा मिस्कील टोल आहे त्यांनी या दरम्यान लावला. व्यासपीठावर आमदार विजयसिंह पंडित डॉक्टर ज्योती मेटे शिवसेनेचे अनिल जगताप व पक्षाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

------------

### बॉलिवूडच्या ही-मॅनची

पुन्हा एकदा १० नोव्हेंबर रोजी त्यांची प्रकृती बिघडली होती. त्याहीवेळी त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची तब्येत बरीच नाजूक असल्याचे सांगण्यात आले होते. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांच्या तब्येतीत सुधारणा न झाल्याने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. मात्र त्यानंतर त्यांना राहत्या घरी हलवण्यात आले. त्यांची तब्येत पाहून त्यांच्या मुलींना देखील परदेशातून ताबडतोब बोलावून घेतले होते. त्यांच्या निधनाने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. धर्मेंद्र यांनी १९६० साली दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. १९६६ मध्ये आलेल्या फूल और पत्थर या चित्रपटाने त्यांना ॲक्शन हिरो म्हणून विशेष ओळख दिली. त्यानंतर त्यांनी शोले, धरम वीर, चरस यांसारख्या अनेक यशस्वी ॲक्शन चित्रपटांतून काम केले. त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात अविस्मरणीय चित्रपट म्हणजे शोले (१९७५), ज्यात त्यांनी वीरू ही भूमिका केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीतील मैलाचा दगड मानला जातो. ते आजही चित्रपटसृष्टीत सक्रिय आहेत. अलीकडील रॉकी और रानी की प्रेम कहानी (२०२३) या चित्रपटातील त्यांची भूमिका खूप गाजली. धर्मेंद्र यांनी राजकारणातही पाऊल ठेवले होते. ते २००४ ते २००९ या काळात राजस्थानमधील बिकानेर मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे खासदार होते.

-------------

### मत आणि निधीबाबत विधानावर मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यावेळी त्यांनी मत आणि निधीबाबत केलेल्या अजित पवार यांच्या वक्तव्याची पाठराखण केली.

----------

### माझ्या छातीवर वर्षभरात

धनंजय मुंडे यांनी सोमवारी परळीत केलेलें भाषण चर्चेला कारण ठरत आहे. परळी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीची परळीत प्रचारसभा आयोजित करण्यात आली. या प्रचारसभेला धनंजय मुंडे यांच्यासह भाजप नेत्या पंकजा मुंडे या देखील उपस्थित होत्या. या प्रचारसभेत धनंजय मुंडे यांनी नाव घेता वाल्मिक कराडचा उल्लेख केल्याची चर्चा आहे. ''आपला एक सहकारी आज आपल्यात नाही. काय चुकले, काय नाही ते न्यायालय बघेल'', असे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी केले. तसेच आपल्यावर वर्षभरात असंख्य वार झाल्याचे वक्तव्य देखील धनंजय मुंडे यांनी केले. ते पुढे म्हणाले, एक वर्षापासून मी सहन केले. मी काय सहन केलेय ते मला फक्त एकट्याला माहिती आहे. जीवनात गेल्या वर्षभरात एवढे वार माझ्या छातीवर झाले. एवढे वार होऊनही मी थोडाही डगमगलो नाही. कारण सर्व शक्ती तुमची माझ्या पाठिमागे होती. ज्यांनी माझी मदत घेऊन आज दगाफटका केला असेल त्यांना फक्त एवढेच सांगणे आहे, केलेली मदत विसरले आहेत. त्यांना अवकातीत आणावे लागेल. अनेक जण आपली हद्द विसरले आहेत. परळीत यायचे, उटसूठ कसेही आरोप करायचे. या गोष्टीच्या मला वेदना नाही झाल्या? हो मला माहिती आहे. परळीत काय, परळी हे असे, ते असे'', असे धनंजय मुंडे म्हणाले. ''अरे काय, किती सहन करायचे? ते सहनही केले, गप्प राहिलो. कारण शेवटी संयम महत्त्वाचा असतो. आपण सर्वांना तशा पद्धतीने ताकद उभी केली. ती ताकद उभ्या महाराष्ट्राला त्या काळात दिसली नाही. पण आपल्याला या निवडणुकीच्या माध्यमातून, सर्वच्या सर्व उमेदवार ऐतिहासिकपणे निवडून आणून, या उभ्या महाराष्ट्राला दाखवायचे आहे. आपण कुणाला खवळत नाही. ज्यांनी ज्यांनी खवळलेय, त्यांना हे उत्तर आपल्याला द्यायचे आहे. मग आपल्यातले मतभेद असतील, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमधील, माझ्या सहकाऱ्यामध्ये मतभेद असतील. मला माहिती आहेत की ते कसे मतभेद आहेत. आजपासून त्यांच्या घरी जाण्याचे आणि मनधरणी करण्याचे काम करणार आहे. जाऊदे बाबा चल. सगळ्या गोष्टी होणार आहे. माझ्या जे काम ते चोख करणार आहे. माझ्यापेक्षा जास्त चोख काम महायुतीचे सहकारी करणार आहेत. मतदारांच्या दारापुढे जावून डोकं ठेवायचे. विजय ऐतिहासिक करायची जबाबदारी पंकजाताई आणि माझी आहे हे वचन द्यायचे आहे, असे ते म्हणाले.

**गव्हाबरोबर किडेही- पंकजा मुंडे**

आपल्या जिल्ह्यात एखाद्या कारणामुळे एकाची बदनामी झाली, ज्याच्यामध्ये त्याचा काहीही संबंध नसताना, तो माणूस त्यामध्ये पिसला जातो. गव्हाबरोबर किडेही रगडले जातात, असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले.

**भर सभेत धनंजय मुंडेंना वाल्मिक कराडची आठवण**

परळी नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या संयुक्त कार्यकर्ता मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केलेले एक वाक्य सध्या बीड जिल्ह्यात प्रचंड चर्चेचे केंद्रबिंदू ठरले आहे. ''गेल्या १० महिन्यांपासून जगमित्र कंपनीचे कार्यालय सुरू आहे पण आज इथे एक माणूस नाही,'' असे धनंजय मुंडे यांनी सभेत बोलताना म्हटले. हे वाक्य ऐकल्यानंतर सभेतील कार्यकर्ते व उपस्थितांच्याच नव्हे, तर संपूर्ण परळी-बीडमधील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कारण 'जगमित्र कंपनी' हे नाव थेट मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड यांच्याशी जोडले जाते.

-----------

### ठाकरे बंधूंचे निवडणूक

शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर मतदार याद्यातील घोळ आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करण्याची मागणी ठाकरे बंधूंनी केली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेत त्यांना पत्र दिले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदारयादी, विभाजनातील गंभीर त्रुटी व गोंधळ दूर करून निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूकप्रक्रिया राबवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेच्या बाळा नांदगावकर यांनी राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. तर, ठाकरेंचे पत्रही आयोगाला दिलं आहे. निवडणूक आयोगाची मतदार याद्यांमध्ये गोंधळ कायम ठेवण्याची, आणि ते कधीही न निस्तरता, ते गोंधळ अधिक गुंतागुतीचे कसे होतील या बाबतीतले जे सातत्य आहे त्याचे अभिनंदन करावे का खेद व्यक्त करावा हेच कळत नाही. असो पण पुन्हा एकदा निवडणूक आयोगाने मतदार यादीशी संबंधित घोळ तसाच ठेवला हे परत सिद्ध झाले. कसं ते सांगतो... असे म्हणत मतदार यादीतील घोळाची माहितीच राज ठाकरेंनी आपल्या पत्रातून निवडणूक आयोगाला दिली आहे. या पत्रात त्यांनी आयोगाच्या सहा गंभीर चुका झाल्याचे सांगत त्या स्पष्टपणे मांडल्या आहेत. आयोगाकडे पत्र दिल्यानंतर आदित्य ठाकरे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाला भेटून आलो, त्यांना उद्धव ठाकरे, राज ठाकरेंचे पत्रही दिलेले आहे. निवडणुका आज होतील, उद्या होतील अजूनही काहीही नाही. हे सरकार वोट चोरून सर्व करत आहे, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मुंबई महापालिकेसाठी वॉर्ड बाऊंडरी जाहिर झाली. प्रारूप मतदार यादी ७ तारखेला येणार होती, ती १४ ला येणार सांगितले, मग २० ला ती आली. भाजप सोडून सर्व विरोधी पक्षांनी यादी वाचन सुरू केले आहे. जात-धर्म पाहून याद्या बदलून आलेल्या आहेत. सगळ्या वार्डात हे केलेले नाही तर फक्त विरोधी पक्ष नेत्यांच्या यादीत हे केलेले आहे, हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. पारदर्शक निवडणूका म्हणता मग हे का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला.

---------

### महिला कबड्डी संघ ठरला

वर्ल्ड कप जिंकण्याची ही सलग दुसरी वेळ ठरली आहे. भारत विरुद्ध चीन तायपे यांच्यातील महामुकाबल्याचे आयोजन हे बांगलादेशची राजधानी ढाका इथे करण्यात आले होते. भारताच्या महिला ब्रिगेडने चीन तायपेवर ७ पॉइंट्सच्या फरकाने मात करत सलग दुसरा वर्ल्ड कप आपल्या नावावर केला. भारतीय महिला संघाचे या विजयानंतर सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या सोशल मीडिया प्लेटफॉर्मवरुन भारतीय संघाचे अभिनंदन केले आहे. मोदींनी भारतीय महिला संघाचं फोटो पोस्ट करुन अभिनंदन केले आहे. चीन तायपेने टीम इंडिया विरुद्ध कडवट प्रतिकार केला. भारतानेही जशास तसे उत्तर दिले. कॅप्टन रितू नेगी आणि उपकर्णधार पुष्पा राणा या दोघींनी रेड आणि टॅकल या दोन्ही आघाड्यांवर दबदबा कायम ठेवला. तर दुस-या बाजूने संजू देवी हीने सुपर रेडद्वारे सामना भारताच्या बाजूने झुकवला. भारताने यासह वर्ल्ड कप ट्रॉफी जिंकली.

**टीम इंडियाचा विजयी 'षटकार'**

दरम्यान टीम इंडिया या स्पर्धेत अजिंक्य राहिली. भारताने साखळी फेरीतील ४ सामने जिंकले. भारताने साखळी फेरीत थायलंड, नेपाळ, बांगलादेश आणि युगांडाला लोळवले. तर उपांत्य फेरीत भारताने इराणला पराभवाची धुळ चारली. तर अंतिम फेरीत पराभूत झाल्याने चीन तायपेला उपविजेता म्हणून समाधान मानावे लागले.

-------------

### मतदानादिवशी मोठी लग्नतिथी

भविष्यावर होणारा परिणाम गंभीर ठरू शकतो. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर जबाबदारी आहे. त्यामुळे अनेक नागरिकांनी 'प्रथम मतदान, नंतर मंगलकार्य' असा निर्धार व्यक्त करण्याची गरज आहे. सामाजिक संस्था आणि स्थानिक नेते नागरिकांना आवाहन करीत आहेत की, विवाह सोहळ्याला जाण्यापूर्वी सकाळीच मतदान करून हक्क बजवावा. काहींनी सकाळी ७ वाजता कुटुंब, नातेवाइकांसह मतदान केंद्रावर जाण्याची तयारी केली आहे. मात्र, ज्यांचे विवाह ठरले आहेत, त्यांना पहाटे निघावे लागणार असल्याने काही ठिकाणी मतदान टक्केवारीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नगरपरीषद आता निवडणुकीतील लढतीचे चित्र स्पष्ट होत आहे. स्थानिक लग्न समारंभ मंडळे, हॉल व्यावसायिक आणि भोजन व्यवस्थापक यांच्या माहितीनुसार २ डिसेंबर हा हंगामातील सर्वाधिक मागणी असलेला शुभ दिवस आहे. अनेक कुटुंबे विवाहासाठी गावाबाहेर जाणार असल्याने पाहुण्यांची ये-जा, वरात व्यवस्था आणि समारंभातील धांदल यामुळे मतदानासाठी वेळ मिळणे कठीण ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का घसरु शकतो.

-------------------

### न्यायमूर्ती सूर्यकांत

आलिंगन दिले. आई-वडिलांचे चरण स्पर्श करत आर्शीवाद घेतले. यावेळी ब्राझीलसह सात देशांतील मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश देखील या समारंभाला उपस्थित होते. भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आंतरराष्ट्रीय न्यायिक शिष्टमंडळाने सरन्यायाधीशांच्या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावली. भूतान, केनिया, मलेशिया, मॉरिशस, नेपाळ आणि श्रीलंकेतील मुख्य न्यायाधीश आणि त्यांचे कुटुंबीय देखील या समारंभाला उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी शहराध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष अय्युब भाई पठाण यांची नियुक्ती

परळी वै. । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी शहराध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष तथा परळी नगर परिषदेचे माजी पाणीपुरवठा सभापती आयुब भाई पठाण यांची आज नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सह मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज संपन्न झालेल्या महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यात अय्युब भाई पठाण यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. मागील आठ वर्षापासून हे पद बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या कडे होते. दरम्यानच्या काळात अय्युब भाई पठाण यांनी नगर परिषद उपनगराध्यक्ष पदी तसेच पाणी पुरवठा सभापती म्हणून देखील उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या नियुक्तीच्या वेळी तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, मावळते अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, युवक आघाडीचे शहराध्यक्ष एजाज शेख, प्रा. विनोद जगतकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत केली जाते वृक्षाची अवैध वाहतूक




शिरूर । प्रतिनिधी

तालुक्याच्या पूर्व भागाच्या सिंदफणा परिसरामधून अवैधरित्या वृक्षतोड होत असून, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन ट्रकच्या माध्यमातून या लाकडांची वाहतूक करून बीड शहर च्या दिशेने घेऊन जात असल्याचे सातत्याने समोर येत आहे.

शिरूर कासार तालुक्यामध्ये वन विभागाच्या अधिकारी,कर्मचारी च्या मेहरबानीने मोठ्या प्रमाणात दरवर्षीच वृक्षतोड होत असते. झालेल्या वृक्षतोडीचे लाकडे रात्रीच्या वेळी चोर वाटाने वाहून नेण्याचे काम व्यापारी लोक मोठ्या धाडसाने करत असतात. हा प्रकार यावर्षीही लवकरच सुरू झाला आहे. शिरूर तालुक्यातील रायमोह,तिंतरवणी महसूल मंडळातून दरवर्षीच मोठ्या प्रमाणामध्ये वृक्षतोड तर होत असते. याविषयी सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार बांधवांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला असता प्रयत्न केला असता प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी याकडे डोळे अर्थपूर्ण झाक करत असतात. मागील पंधरा दिवसांपूर्वी वन विभागाने कारवाई करून तालुक्यातील खालापुरी येथे एक लाकडाने भरलेला ट्रक पकडला होता. वन विभागाने केलेल्या तुकड्या कारवाईची प्रसिद्धी मिळावी यासाठी वेगवेगळ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांनी वृत्तपत्रांमधून बातम्याही छापून आणल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी याच परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वृक्षतोड होत असतानाही वनपरिक्षेत्र विभागाचे अधिकारी कर्मचारी का दुर्लक्ष करत आहेत. खलापुरी मध्ये ज्या पद्धतीने लाकडाने भरलेले ट्रक वर कारवाई झाली. त्याप्रमाणे पुन्हा दुसऱ्या वाहनावर का कारवाई होत नाही. असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडत आहे. रविवार दि. २३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान शिरूर कासार तालुक्यातून लाकडाचा भरलेला ट्रक फुलसांगवी- धारवंटा मार्गे बीड शहराकडे जात असताना स्थानिक लोकांच्या तथा पत्रकारांच्या ही गोष्ट निदर्शनास आली. म्हणून वन विभागाचे वनरक्षक जोशी यांच्याशी यासंबंधी विचारणा केली असता हा ट्रक आमच्याच परिक्षेत्र विभागातून भरून जात आहे याचा तुमच्याकडे काय पुरावा आहे. आमच्या या कार्यक्षेत्रामध्ये कोठे वृक्षतोड झाली आहे याचे आम्हाला पुरावे द्या अशी पत्रकारांनाच उद्धट भाषा वापरली गेली आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन अवैद्य लाकूड वाहतूक करणारी वाहने कोणाची आहे. त्यावर वन विभागाकडून कारवाई का केली जात नाही. याबद्दल मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. लाकडांची वाहतूक रात्रीच्या अंधारात जरी होत असली तरी वृक्षतोड ही दिवसाढवळयात होत असेल यासंबंधीची वनविभागाकडे माहिती का नसावी.

### अवैध वाहतुकीवर कारवाई केली जाणार – देवगुडे

शिरूर तालुक्यामधून रात्रीचा फायदा घेऊन जर व्यापाऱ्याकडून अवद्यरित्या लाकूड वाहतूक केली जात असेल तर त्यासंबंधी आम्हाला जनतेने सहकार्य करून माहितीपूर्वीच जावी. त्याचबरोबर आम्हीही पाटोदा वनपरिक्षेत्र विभागाच्या माध्यमातून पेट्रोलिंग वाढवणार आहोत. जर असे प्रकार आढळून येत असतील तर व्यापाऱ्यांच्या या वाहनावरती वन विभागाच्या वतीने कारवाई केली जाईल

अजय देवगुडे, प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी,पाटोदा

थोडक्यात



बीड : एलसीबीचे पोलीस जमादार सलीम भाई यांची पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांनी पदोन्नती च्या शुभेच्छा देऊन अभिनंदन केले



## मजुराचा मुलगा अर्जुन ढगे याची सैन्य दलात निवड; ग्रामस्थांकडून सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

शहरानजीक असलेल्या मनूर येथील वीटभट्टी मजूर बाळू ढगे यांचा मुलगा अर्जुन ढगे याने बिकट परिस्थितीवर मात करत सैन्य भरतीचा सराव केला व अखेर त्यास यश मिळाले असून, अर्जुन याची सैन्य दलात निवड झाली आहे. अर्जुन याची सैन्यदलात निवड झाल्याबद्दल मनूर गावात आनंद व्यक्त केल्या जात असून, रविवारी गावकऱ्यांच्या वतीने सरपंच सुभाष तोरगले, माजी सरपंच विनोद सुरवसे, प्रदीप कर्डिले, संतोष कर्डिले, दादा डुकरे, राज गवते, प्रदीप आडागळे, किरण ढगे, हनुमान कर्डिले, अशोक शिंदे, रामकिसन कर्डिले यांनी अर्जुन व त्याचे वडील बाळू ढगे या दोघांचाही शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन व पेढे भरवून सत्कार करून त्यांना देशसेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आनंतराव खेत्रे यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वाहेगाव आमला येथील रहिवासी असलेले महिला आर्थिक विकास महामंडळाचे नांदेड जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत असलेले अनंतराव खेत्रे यांच्या मातोश्री श्रीमती ताराबाई लक्ष्मणराव खेत्रे यांचे दिनांक २४ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता वृपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते. त्यांच्यावर आज दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता त्यांच्या राहत्या गावी वाहेगाव (अमला) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक आनंतराव खेत्रे यांच्या मातोश्री श्रीमती ताराबाई लक्ष्मणराव खेत्रे यांचे दिनांक २४ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता निधन झाले. त्या गेल्या काही दिवसापासून आजारी होत्या. त्यांच्यावर घरीच उपचार चालू असतांना त्यांचे निधन झाले. दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता त्यांच्यावर त्यांच्या राहत्या गावी गेवराई तालुक्यातील वाहेगाव (अमला) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. खेत्रे परीवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



## जागतिक दिव्यांग दिनादिवशी दिव्यांग व्यक्तीच्या मागण्यासाठी आंदोलन करणार –अशोक दगडखैर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या प्रश्नाकडे शासनास्तरातुन तहसीलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असले बाबत दि.०३ डिसेंब २०२५ रोजी दिव्यांग दिना निमित्त तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्यात येणार आहे असे दिव्यांग संघर्ष समिती चे जीलनी शेख व अशोक दगडखैर यांनी म्हटले आहे

मागण्या खालील प्रमाणे

दिव्यांग व्यक्तीचे संजय गांधी योजनेचे मानधन उर्वरीत १००० रुपये हाप्ता त्वरीत वर्ग करण्यात यावा तसेच पाटोदा तालुक्यातील बऱ्याच दिव्यांग व्यक्ताना २५०० रुपये ऐवजी १५०० रुपये आले आहेत तरी सदरील दिव्यांग व्यक्तीचे कागदपत्र तात्काळ घेऊन त्यांना उर्वरीत रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी,पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्ताना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा नगरपंचात अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा करीता कसल्याही प्रकारची कारवाई केलेली




नाही तरी दिव्यांग कायदा २०१६ अंतर्गत संबधीत गटविकास यांना दिव्यांग कल्याण विभाग जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय बीड यांनी आदेश देऊन ही कार्यवाही केली नाही , पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा व ज्या दिव्यांग व्यक्तीचे घरकुल योजनेत नाव आलेले आहे त्यांना तात्काळ प्रथम प्राधान्याने घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा,अंत्यादोय राशन कार्ड योजने अंतर्गत शासनाच्या पारपत्राकानुसार दिव्यांग व्यक्तीना तात्काळ जाचक अट न देता या योजनेचा लाभ देण्यात यावा ,पाटोदा तहसील अंतर्गत संजय गांधी विभाग कायमस्वरुपी तळमजल्यावर घेण्यात यावा.

वरील सर्व प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी नसता जागतीक दिव्यांग दिनी दि.०३ डिसेंबर २०२५ वार बुधवार या दिवशी तहसील कार्यालया समोर योग्य प्रकारचे आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे निवेदनात जीलानी शेख , अशोक दगडखैर , वैभव देशमुख , दत्ता कदम , बजरंग लांडगे , बापु पावसे हनुमंत काळूशे बांगर , संतोष गुंजाळ , शेरे कांकरीया , कैलास मकाळ यांनी म्हटले आहे



बीड : एलसीबीचे पोलीस जमादार अशोक नलावडे यांची पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांनी पदोन्नती च्या शुभेच्छा देऊन अभिनंदन केले

## आदर्श मार्केटमध्ये प्राणप्रतिष्ठा सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील सुभाष रोडवर असलेल्या आदर्श मार्केट जनावरांच्या दवाखान्याच्या बाजूला दत्तधाम मंदिर जीर्णोद्धार आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन दिनांक २५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.**

बीड शहरातील सुभाष रोड भागामध्ये पशु चिकित्सालयाच्या बाजूला इच्छापूर्ती दत्तधाम मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी दत्तमूर्ती शोभायात्रा सकाळी अकरा वाजता दत्तधाम मंदिर येथून निघून सांगली बँक, स्टेडियम रोड, स्वामी समर्थ मंदिर, गजानन मंदिर, सारडा नगरी ,डीपी रोड, सुभाष रोड आदर्श मार्केट या मार्गाने जाईल. दिनांक २७ नोव्हेंबर रोजी श्री दत्तमाला मंत्र ,प्रधान देवता हावन, सुवर्णकलस्नान अन्न, अधिवास, सुवर्णभस्म स्नान, श्री दत्तप्रभू चे नेत्रमिलन, पुष्प जीवास, आरती व प्रसाद होईल. शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी गणेश पूजन ,सरस्वती पूजन ,भूमिपूजन, वरूण पूजन, पंचकाव्य प्रायचित्त, अनुवादक पूजन, मंडपूजन, अग्नी स्थापन ,संस्कार मंडप व जलाधिवास आरती व महाप्रसाद होईल. शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी दुपारी एक ते पाच या वेळेत महाप्रसाद होणार असून या सर्व कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मच्छिंद्र उपरे, सुरेश पांडकर, गणेश मुळे आदींनी केले आहे.

## अशोक आहूजा यांची भूमिका शेवगावकर मतदारांना रुचेल का?

अहिल्यानगर । प्रतिनिधी

मूळचे भाजपाचे असलेले अशोक आहुजा यांची भूमिका शेवगाव मधील मतदारांना रुचेल का ?

काही दिवसांपूर्वी पाथर्डी रोडवरील एका हॉटेल मध्ये आमदार मोनिका राजळे यांच्या विरोधात बंड पुकारलेले माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक आहूजा यांनी परत एकदा दुपट्टी भूमिका घेतल्यामुळे त्यांच्याबद्दल शेवगाव शहरातील नागरिकांकडून उलट सुलट चर्चा चालू आहे..

काही दिवसांपूर्वी हॉटेल मंगेश येथे भाजपाचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांच्याबरोबर संयुक्त पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आमदार मोनिका राजळे यांच्यावर नात्यागोत्याचे राजकारण करीत असल्याची टीका केली होती. आता त्याच नातेवाईकांबरोबर संयुक्त पत्रकार परिषद घेण्याची वेळ अशोक आहुजा यांच्यावर आली, परंतु पत्रकार परिषदेमध्ये अशोक आहूजा काहीसे नाराजच दिसत होते. पडद्यामागे काय घडामोडी घडल्या याबद्दल नागरिकांना काही घेणे देणे नाही.. परंतु शेवगाव तालुक्याची बुलंद तोफ असणारे दिलीपराव लांडे यांचा पराभव करून ते जिल्हा परिषद सदस्य पदापर्यंत पोहोचले. त्यावेळी शेवगाव शहरातील नागरिकांनी घराणेशाही भेदत त्यांच्यावर मोठा विश्वास दाखवला होता. परंतु आता त्याच नात्यागोत्यात व घराणेशाहीच्या वळचणीला अशोक आहुजा बसल्याने शेवगावकर नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांचे पूर्वश्रमीचे मित्र बंडूशेठ रासने यांनी मात्र ह्या सर्व घडामोडी पासून अलिप्त राहून राजकारणातील आपला वेगळा व विश्वासू कार्यकर्ता म्हणून आपली ओळख कायम ठेवली, त्याची दुसरी बाजू म्हणजे अशोक शेठ मात्र आपली राजकारणातली विश्वासाची असलेली एक परंपरा व मूळ भाजपाचे ही एक असलेली त्यांची ओळख गमावून बसले की काय ? असा प्रश्न शेवगावकरांना ह्या नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने पडला आहे ! एक तर अशोक शेठ यांचे वास्तव्य शेवगाव मध्ये कमी व नगरमध्ये जादा आहे. त्यांचा मतदारांशी असलेला संपर्कही पहिल्यासारखा राहिलेला नाही. अरुण मुंढे यांनी आपल्या धर्मपत्नी माया मुंढे यांची उमेदवारी शिंदे गटातून दाखल केल्यानंतर काही मिनिटातच अशोक शेठ त्यांना भेटण्यासाठी गेले. एका रात्रीतच अशी काय भुरळ आहूजा यांना पडली ? भुरळ पडेना का परंतु.....ये पब्लिक है सब जानती है

## पान ६ वरुन...

### अमर नाईकवाडे यांचा आक्षेप

देण्यात आला आणि त्या आधारेही उमेदवारी योग्य असल्याचे न्यायालयाने स्वीकारले.अमृत काकांच्या बाजूने निकाल दिला. अमृत काका सारडा यांच्या बाजूने ॲड. बालाप्रसाद जाजू,ॲड.राधेश्याम जाजू यांनी बाजू मांडली. तर अमर नाईकवाडे यांच्या बाजूने उच्च न्यायालयाचे ॲड. सय्यद तौफिक यांनी बाजू मांडली. पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून जात, पात, धर्म न पाहता हजारो नागरिकांच्या सुख-दुःखात उभे राहणारे, विकासाचे काम प्रत्यक्षात करणारे आणि लोकांचा विश्वास जिंकलेले अमृत काका हे या निवडणुकीत आघाडीवर आहेत हे चित्र स्पष्ट झाले आहे.

### सोळा वर्षीय तरुणाकडून

तक्रार केली तर अब्रू जाईल आणि आम्हांला मारतील या भीतीपोटी या घटनेची तक्रार केली नव्हती. मात्र पीडित आईच्या तक्रारीवरून गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी शिरूर पोलीस स्टेशन मध्ये पोक्सो कायद्या अंतर्गत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार (१६) गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीही अल्पवयीन असल्यामुळे त्याला अटक करून बालसुधारगृहांमध्ये पाठवण्यात आले असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव यांनी दिली आहे.

### कड्यात बालिकेवरील

जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. बालिकेवरील अत्याचाराच्या घटनांना आळा बसावा म्हणून कठोर कायदे आणि कडक अंमलबजावणीची मागणीही करण्यात आली.या भयंकर घटनेमुळे नागरिकांत तीव्र संताप असल्याचे रॅलीतून स्पष्टपणे दिसून आले.या रॅलीदरम्यान मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवून विध्यार्थीनीच्या पोलिसांच्या वतीने निवेदन स्विकारण्यात आले. राजे तुम्ही असते तर रांझाच्या पाटलासारखे त्या नराधमाचे हातपाय कलम केले असते असे भावना व्यक्त करण्यात येत होती.

### शिरूरकरांनी साहित्य चळवळ

आगळे वेगळे ठरणार आहे. त्या अनुषंगिक बोधचिन्हाचे अनावरण सहाव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. सिंदफणा नदी ही बीड जिल्ह्यातील जीवनवाहिनी आहे. सिंदफणा नदीच्या काठावर वसलेले भाषिक, सांस्कृतिक जनजीवन साहित्याच्या माध्यमातून चित्रीत करण्याचा संदेश बोधचिन्हातून देण्यात आला आहे. याप्रसंगी आजिनाथ गवळी, मसाप शिरूरचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. अशोक घोळवे, साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव, सतिश मुरकुटे, जमीर शेख आदी उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह आजपासून सुरु होणार

### श्रीकांत देशमुख यांचे हस्ते उद्घाटन तर समारोप डॉ. कमलताई गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार.

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४१ वे वर्ष असून तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, सुगम संगीत, शालेय चित्रकल व बाल आनंद.मेळावा, शेतकरी परिषद, शास्त्रीय संगीत कार्यक्रम, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार वितरण, समारोप समारंभ असा दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर मंगळवार, बुधवार व गुरुवार असा संपन्न होणार आहे. हे सर्व कार्यक्र वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालय संपन्न होतील अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.**

उद्घाटन व कवी संमेलन

यावर्षी ४१ वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहचे उद्घाटन नांदेडचे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक, प्रसिद्ध साहित्यिक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते आज सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. रात्री आठ वाजता कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले यात महाराष्ट्रातील विविध भागातील कवी सहभागी होणार आहेत. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी नांदेड येथील प्रसिद्ध कवी प्रा. डॉ. पी. विठ्ठल हे असणार आहेत तर या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेला कवी, कीर्तनकार, महावक्ता अविनाश भारती हे करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी सर्वश्री शरद धनगरअमळनेर, पुनीत मातकर यवतमाळ, अनंत राऊतअकोला, डी.की. शेख धाराशिव, लता ऐवळे कदम सांगली, अविनाश काठवटे छत्रपती संभाजीनगर, गुंजन पाटील सोयगाव, गजानन मतेअमरावती, सुनील उन्हाळेछत्रपती संभाजीनगर , सय्यद चांद तरोडकर परभणी व आत्माराम जाधवगंगाखेड यांचा सहभाग राहणार आहे.

बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता ८ वी ते १० वी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. सकाळी १०. ३० वाजता बाळ आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून त्यातच चित्रकला स्पर्धा विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. सुप्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल जाधवशिरूर कासार हे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून अंबाजोगाई येथील प्रसिद्ध चित्रकार त्र्यंबक पोखरकर हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

सोबतीचा करार

सायंकाळी ८ वाजता पुणे येथील सुप्रसिद्ध कवी वैभव जोशी यांच्या कविता व गझलेवर आधारित ‘‘सोबतीचा करार‘‘ या संगीत मैफिल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.असून यात दत्तप्रसाद रानडे गायन करतील तर त्यांना सिंथसायजेर व सहगायन निनाद सोलापूरकर, तबला समीर शिवगार, ढोलक आमोद कुलकर्णी हे साथ करतील. या सर्व रचनांचे संगीतकार आशिष मुजुमदार यांनी संगीत दिले असून तेही साथ करणार आहेत.

गुरुवार दिनांक २७ नोव्हेंबर २९२५ रोजी सकाळी १०.३० वाजता शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण हे यशवंतराव चव्हाण यांचे कृषीऔद्योगिक धोरण आणि वर्तमान शेती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी केळसांगवी ता. आष्टी येथील प्रयोगशील महिला शेतकरी श्रीमती विजया गंगाधर घुले या असणार आहेत. त्यांनी शेतीत केलेले प्रयोग व देशी विदेशी फळबाग व उत्पादन याविषयी अनुभव सांगणार आहेत.

समारोप समारंभ व पुरस्कार वितरण

सायंकाळी ५.३० वाजता या समारोहाचा समारोप समारंभ होत असून अध्यक्षस्थानी अमरावती येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षण तज्ज्ञ डॉ. कमलताई रामकृष्ण गवई ह्या उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराचे मानकरी श्रीमती विजया गंगाधर घुले केळसांगवी ता.आष्टी यांना कृषी, केशव वसेकरपरभणी यांना साहित्य, पं. मुकेश जाधवपुणे यांना संगीत व कळमअंबा ता. केज येथील विश्वविजेत्या भारतीय महिला खो खो संघाची कर्णधार कु. प्रियंका हनुमंत इंगळे हिला क्रीडा युवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पहार, रोख पाच हजार रुपये असे आहे. याच समारंभात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे मार्गदर्शक रसिकाग्रणी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भगवानराव शिंदे बप्पा यांचा विशेष सन्मान कमलताई गवई यांच्या हस्ते करण्यात येईल.

शास्त्रीय संगीत संभा

समारोप समारंभानंतर रात्री ८ .३० वाजता शास्त्रीय संगीत सभेचे आयोजन करण्यात आले असून यात जगप्रसिद्ध तबलावादक पं. मुकेश जाधव यांचे तबला सोलो वादन होईल त्यांना संवादिनीवर अभिषेक शिनकर साथ करतील. त्यानंतर आघाडीचे आंतरराष्ट्रीय शास्त्रीय गायक कृष्णा बोंगाणे यांचे गायन होईल. त्यांना तबल्यावर आशय कुलकर्णी व संवादिनीवर अभिषेक शिनकर हे साथसंगत करतील. तिन्ही दिवस, ग्रंथ प्रदर्शने व विक्री, चित्रकला प्रदर्शने भरवली जाणार आहेत.सर्व नागरिक रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास जरूर उपस्थित रहावे असे आवाहन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०२५



# शेतकऱ्यांना नमो किसान योजनेचा हप्ता डिसेंबरमध्ये मिळणार

## आचारसंहिता असल्याने हप्त्यास होतोय विलंब

पुणे : नमो किसान महासन्मान निधी योजनेचे २००० रुपये कधी शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा होतील याबाबत सरकार कडून अद्याप तरी कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. परंतु मीडिया रिपोर्टनुसार, डिसेंबर मध्ये या योजनेचे पैसे मिळू शकतील. दुसरीडे महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असल्याने आचारसंहिता संपल्यानंतरच नमो किसान योजनेचा आठवा हप्ता शेतकऱ्यांना मिळेल असाही दावा करण्यात येत आहे.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजेनचे पैसे शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर आता राज्य सरकारकडून मिळणाऱ्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा हप्ता कधी मिळणार याकडे राज्यातही शेतकरी डोळे लावून बसला आहे. खरं तर शेतकऱ्याना शेती करत असताना आर्थिक हातभार लागावा हा उद्देश डोळ्यासमोर



ठेऊनच तत्कालीन शिंदे सरकारने पीएम किसानच्या धर्तीवर नमो किसान सन्मान निधी योजनेची घोषणा केली होती. आत्तापर्यंत या योजनेच्या माध्यमातून एकूण ७ हप्ते शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा झाले असून आता ८ व्या हप्त्याच्या प्रतीक्षेत बळीराजा आहे. किसान योजनेचा हप्ता जमा झाल्यानंतर साधारणतः १० ते २० दिवसांनी शेतकऱ्यांच्या खात्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे पैसे जमा होत असतात. कारण ज्यांना पीएम किसानचे पैसे मिळतात त्याच शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेचे पैसे देण्यात येतात. पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हफ्ता जमा झाल्यानंतर केंद्रीय कृषी विभागाकडून राज्याच्या कृषी विभागाला लाभार्थी शेतकऱ्यांची यादी पाठवली जाते. यानंतर या यादीनुसार राज्यातील लाभार्थ्यांना नमो शेतकरीचा हफ्ता मिळतो. यावेळी १९ नोव्हेंबर रोजी पीएम किसानचे २००० रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. आता राज्याच्या नमो किसान योजनेचा हप्ता डिसेंबर महिन्यात दिला जाणार आहे. सद्या नगरपालिका निवडणुकिची आचारसंहिता लागली असल्याने हा हप्ता देण्यास उशिर होतो आहे.

## आंबा मोहरावरील बुरशीजन्य रोगांना टाळा



सद्य स्थितित राज्यभर पाऊस आणि ढगाळ वातावरण असल्याने आर्द्रता वाढून तापमानात घट होण्याची शक्यता आहे. अशा वेळी आंबा बागेत पालवी, मोहरावर विविध बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कोवळी पालवी आणि मोहराची गळ होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. आंबा बागेतील विविध रोगाच्या नियंत्रणा विषयी माहिती घेणे गरजेचे आहे. पालवी, मोहर आणि कळीवर करपा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास कोवळ्या पालवीवर करड्या तपकिरी रंगाचे खोलगट आणि पिवळसर कडा असलेले डाग दिसून येतात. यामुळे मोहर तांबुस होऊन वाळू लागतो आणि मोठ्या प्रमाणावर फुलगळ होते. मोहरामध्ये फुलांच्या देठावर व उमललेल्या फुलावर काळसर विटकरी डाग दिसून येतात. यामुळे मोहर करपून जातो. याचे नियंत्रण करण्याची गरज असते.

अशी घ्या काळजी : आंबा बागेमध्ये नियमित स्वछता ठेवावी. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी ॲझाक्सीस्ट्रॉबीन २३ टक्के ईसी १० मिली किवा कॉपर ऑक्सीक्लोराइड ५० टक्के डब्लूजी २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १२ टक्के अधिक मँकोझेब ६३ डब्लूपी १५ ग्रॅम प्रति १० लीटर पाणी घेऊन फवारणी करावी. १ टक्का तीव्रतेच्या बोर्डो मिश्रणाने देखील हा रोग नियंत्रणात आणता येतो. एक टक्का बोर्डो मिश्रण १ किलो मोरचुद +१ किलो कळीचा चुना +१०० लिटर पाणी घेऊन तयार करावे.

भुरी : आंब्याच्या पालवीवर आणि मोहरावर येणारा दुसरा महत्वाचा रोग म्हणजे भुरी. भुरी हा बुरशिजन्य रोग आहे. या रोगामुळे मोहर आणि छोटी फळे यांची गळ होऊन नुकसान होते. मोहरावर पांढरी बुरशी येते. फुले उमलत नाहीत, मोहर गळू लागतो. पानाच्या दोन्ही बाजूवर अनियमित राखाडी रंगाचे ठिपके दिसून येतात. पुर्ण वर्षभर बुरशी सावलीत रोगग्रस्त पाने, फुले इत्यादीवर सुप्त अवस्थेत राहते आणि जानेवारी ते मार्च या काळात अनुकूल वातावरण मिळताच प्रादुर्भाव करते. वाढती आर्द्रता आणि तापमानात होणारे बदल या बुरशीच्या वाढीसाठी अनुकूल ठरतात. या बुरशीच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम ४६.२७ टक्के एससी १० ग्रॅम किवा डिनोकॅप ४८ टक्के ईसी ५ मिली किवा हेक्झाकोनॅझोल ५ टक्के ईसी २० मिली किंवा पेणाकोनाजोल १० टक्के ईसी ५ मीली किवा कार्बेडझिम १२ टक्के अधिक मँकोझेब ६३ टक्के डब्लुपि १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. वरील सर्व कीडनाशकांना लेबल क्लेम आहेत. प्रभावी नियंत्रणासाठी कीडनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी.

## तमालपत्र पानाच्या शेतीतून होतो मोठा फायदा

भारत हा कृषीप्रधान देश आहे, मात्र या ठिकाणी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे सर्वाधिक आर्थिक नुकसान होते. शेतकरी शेतीत अनेक वेगेवेगळी पिके घेऊन नफा कमवायचा प्रयत्न करत असतात. यामध्ये कधी शेतकऱ्यांना नफा मिळतो तर कधी तोटा देखील सहन करावा लागतो. आपण ज्या पिकाबद्दल बोलत आहोत ते तमालपत्र आहे. तमालपत्र प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात आढळते. काही ठिकाणी याचा वापर मसाला म्हणून केला जातो तर काही ठिकाणी याचा वापर डेकोक्शनमध्ये केला जातो. भारतासह संपूर्ण जगामध्ये या पानाची मागणी वर्षभर असते. त्यामुळे या पानाची शेती केल्यास चांगला नफा मिळतो. त्यामुळे तुम्ही जर तमालपत्राची लागवड वेळेवर केली तर सामान्य पारंपरिक पिकांपेक्षा यामधून जास्त नफा मिळेल.

लागणारी जमीन : तमालपत्रांची लागवड अनेकदा खडकाळ जमिनीवर केली जाते. त्यामुळे जर तुमच्याकडे खडकाळ जमीन असेल तर तुम्ही देखील याची लागवड करू शकता. त्याच्या लागवडीसाठी, मातीचे पीएच मूल्य ६ ते ८ दरम्यान असले पाहिजे, त्याचबरोबर त्याच्या झाडांमधील योग्य अंतराची देखील काळजी घेणे गरजेचे आहे. याची लागवड जून ते जुलै दरम्यान केली जाते.

तमालपत्राची लागवड कुठे होते : भारतामधे सध्या उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक आणि केरळ त्याचबरोबर ईशान्य भारतातील डोंगराळ भागात याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. परदेशात देखील याची लागवड केली जाते. इटली, रशिया, फ्रान्स, बेल्जियम त्याचबरोबर अमेरिकेच्या काही भागामध्येही याची लागवड केली जाते. आता महाराष्ट्रातही याचे प्रयोग होवू लागले आहेत.

## आता वन्य प्राण्यांमुळे नष्ट झालेल्या पिकांसाठी सुद्धा विमा संरक्षण



पुणे : केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांसाठी मोठी मदत जाहीर केली. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन मागण्यांपैकी दोन प्रकारचे नुकसान आता प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत भरपाई दिली जाईल.

चौहान यांनी एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'मी आज तुम्हाला आनंदाची बातमी देत आहे. आता, वन्य प्राण्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई दिली जाईल. याव्यतिरिक्त, अतिवृष्टीमुळे पूर किंवा पाणी साचल्याने झालेल्या पिकांच्या नुकसानाचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे.' त्यांनी सांगितले की, प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत दोन नुकसान भरपाई देण्यात आली नव्हती आणि ती दीर्घकाळापासूनची मागणी होती: वन्य प्राण्यांमुळे झालेल्या पिकांचे नुकसान; आणि अतिवृष्टीमुळे पूर किंवा पाणी साचल्याने झालेल्या पिकांचे नुकसान. मी तुम्हाला कळवू इच्छितो की हे दोन्ही नुकसान आता पीक विमा योजनेअंतर्गत समाविष्ट आहेत. जर वन्य प्राण्यांनी पिकांचे नुकसान केले तर भरपाई दिली जाईल. पाणी साचल्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास भरपाई दिली जाईल.

## रब्बी ज्वारी पिकावरील मावा कीड

रब्बी हंगामात लवकर लागवड केलेले ज्वारी पीक सध्या वाढीच्या अवस्थेत आहे. या पिकावर खोडमाशी, खोड पोखरणारी अळी, मिजमाशी अशा अनेक महत्त्वाच्या किडींचा प्रादुर्भाव आढळत असतो. परंतु या वर्षी पिकाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच मावा या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सर्वात महत्त्वाची व आनंदाची बाब म्हणजे या किडींवर उपजीविका करणाऱ्या मित्रकिटकांची उपस्थितीही शेतात दिसत आहे. या लेखामध्ये या किडीबाबत आणि तिच्यावर उपजीविका करणाऱ्या मित्रकीटकांची ओळख छायाचित्रांच्या माध्यमातून करून घेऊ.

मावा : ज्वारी, मका, बाजरी, राळा इ. पिकांवर आढळून येते. याची पिल्लावस्था ही अवस्था चार टप्प्यातून पूर्ण होते. पहिल्या अवस्थेत पिल्ले अंडाकृती, फिकट हिरव्या रंगाची आणि वरच्या बाजूस थोडी फुगलेली दिसतात. डोके, पाय आणि अँटेना हे शरीराच्या तुलनेत किंचित गडद रंगाचे असतात. पोटाच्या मागील बाजूस दोन छोट्या नळीसारख्या रचना (कॉर्निकल्स) दिसतात. दुसऱ्या अवस्थेतील पिल्ले आकाराने थोडी मोठी, फिकट हिरवी आणि तुलनेने कमी हालचाल करणारी असतात.

तिसऱ्या अवस्थेत पिल्लांचे शरीर लांबट होऊ लागते, रंग किंचित गडद होतो आणि कॉर्निकल्स अधिक स्पष्ट दिसतात. चौथ्या अवस्थेत पिल्ले



गडद हिरव्या रंगाची, आकाराने मोठी आणि काळ्या रंगाचे ठळक कॉर्निकल्स असलेली दिसतात. पिल्लावस्थेतील किडीची लांबी सुमारे ०.७२ मि.मी. आणि रुंदी ०.३० मि.मी. असते. तापमानानुसार किडीचा रंग बदलतो. उष्णतेत रंग पिवळसर तर थंडीत गडद हिरवा दिसतो.

जीवनक्रम : मादी अंडी न घालता थेट पिल्लांना जन्म देते. ती नराशिवाय प्रजनन करते. प्रत्येक मादी साधारणतः ३५ ते ४० पिल्लांना जन्म देते. पिल्लावस्था साधारण ७ ते ८ दिवसांची, तर प्रौढ अवस्था १० ते १२ दिवसांची असते. एका पिढीचा संपूर्ण जीवनचक्र साधारणतः दोन आठवड्यांत पूर्ण होतो. (प्रयोगांमध्ये तापमानानुसार जीवनचक्राचा कालावधी बदललेला आढळतो.)

नुकसानीचे स्वरूप : किडीची पिल्ले आणि प्रौढ मध्य पानांच्या घडीत (पोंग्यात), खोडावर व फुलोऱ्यावर समूहाने राहून रस शोषतात. परिणामी पाने पिवळी पडतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास पानांच्या कडा तपकिरी व कोरड्या होतात. पिकाची वाढ मंदावते. ही कीड आपल्या विष्ठेद्वारे मधासारखा चिकट द्रव सोडते. त्यावर काळी बुरशी वाढून पाने काळी दिसू लागतात. त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. ही कीड या विषाणूजन्य रोगाच्या प्रसारासाठी वाहक म्हणूनही काम करते. पिकाच्या फुगवटा अवस्थेत या किडीचा प्रादुर्भाव सर्वाधिक आढळतो.

किडीचे व्यवस्थापन : पर्यायी यजमान असलेल्या तणांचा नायनाट करावा. नत्रयुक्त खतांचा संतुलित वापर करावा. पेरणीपूर्वी शेतात आधीच्या हंगामात किडीचे यजमान पीक निवडले गेलेले नसल्याची खात्री करावी. ढालकिडे, क्रायसोपा, सिरफिड माशी आदी मित्रकिटकांचे संवर्धन करावे.

रासायनिक नियंत्रणाविषयी : केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणीकरण समितीच्या नोंदीनुसार, या किडीस कोणत्याही रासायनिक कीटकनाशकाची शिफारस नाही. त्यामुळे प्रादुर्भाव जास्त आढळल्यास ॲग्रेस्को शिफारशीच्या आधारे, तसेच मित्रकीडांची संख्या लक्षात घेऊन संबंधित तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच फवारणीचे नियोजन करावे. या किडीच्या नियंत्रणामध्ये मित्रकीटकांची महत्त्वाची भूमिका असल्याने, त्यांना हानी पोहोचवणाऱ्या कीटकनाशकांचा वापर टाळावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: शाकाहार दिन

### महत्वाच्या घटना

१६६४ : छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याचा पाया घातला.
१७५८ : ब्रिटन या देशाने आजच्याच दिवशी फ्रांस च्या डोक्विन्सोन या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून किल्ला काबीज केला होता.
१८६७ : अल्फ्रेड नोबेल या शास्त्रज्ञाने आजच्या दिवशी डायनामाईट चे पेटंट केले होते.
१९२२ : मधुमेह या आजारावरील इन्सुलिन चा शोध फ्रेडरिक बँटिंगनी यांनी जाहीर केला.
१९४१ : आजच्याच दिवशी लेबेनॉन या देशाला फ्रांस या देशाकडून स्वातंत्र्य मिळाले होते.
१९४८ : नेशनल कॅडेट कोर्सची स्थापना.
१९६५ : आजच्याच दिवशी फ्रांस या देशाने स्वतःचा पहिला उपग्रह अवकाशात सोडला होता.
१९७५ : सुरीनामला नेदरलँड्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७५ : सुरीनामला (नेदरलँड्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमवर पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला.
१९९१ : कमल नारायण सिंग यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना कलकत्ता येथील 'इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन'तर्फे देण्यात येणारा 'राज क्रिस्टो दत्त स्मृती पुरस्कार' जाहीर
१९९९ : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना 'इंदिरा गांधी शांतता पुरस्कार' जाहीर
२००० : सतारवादक उस्ताद अब्दुल हलीम जाफर खाँ यांना मध्यप्रदेश सरकारचा 'तानसेन सन्मान' जाहीर
२००१ : आजच्याच दिवशी वरिष्ठ पाकिस्तानी राजनेता बेनजीर भुट्टो या तत्कालीन भारतीय प्रधानमंत्रीअटल बिहारी वाजपेयीयांना दिल्ली येथे भेटल्या होत्या.
२००२ : लुसिया गुटेरेज आजच्याच दिवशी इक्काडोर या देशाचे राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४१ : जर्मन गणितज्ञ आन्स्र्ट श्रोडर यांचा जन्म.
१८४४ : मर्सिडीज-बेंझ चे संस्थापक कार्ल बेंझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १९२९)
१८७२ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम नाटककार व पत्रकार, 'केसरी'चे संपादक, 'नवाकाळ'चे संस्थापक (मृत्यू: २६ ऑगस्ट १९४८)
१८७९ : साधू वासवानी आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८८२ : सावळाराम लक्ष्मण हळदणकर चित्रकार (मृत्यू: ३० मे १९६८)
१८८९ : आध्यात्मिक गुरु व शिक्षणतज्ञ साधू वासवानी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी १९६६)
१८९० : प्रसिध्द साहित्यकार सुनीती कुमार चाटर्जी यांचा जन्म झाला होता.
१८९८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक देबाकी बोस यांचा जन्म.
१९८२ : प्रसिध्द भारतीय महिला क्रिकेट खेळाडू व वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी हिचा आजच्याच दिवशी जन्म झाला होता.
१९८३ : भारतीय क्रिकेटर झुलन गोस्वामी यांचा जन्म.
१९२१ : नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२६ : रंगनाथ मिश्रा भारताचे २१ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १३ सप्टेंबर २०१२)
१९३५ : महाराष्ट्रीय हॉकीपटू गोविंद सावंत यांचा जन्म.
१९३७ : शिक्षणतज्ज्ञ साधू वासवानी यांचा जन्म.
१९३९ : उस्ताद रईस खान मेवाती घराण्याचे गायकी अंगाने वाजवणारे सतारवादक
१९५२ : इम्रान खान पाकिस्तानी क्रिकेटपटू व राजकारणी
१९६३ : लोकसभा सदस्य अरविंद कुमार शर्मा यांचा जन्म झाला होता.
१९६९ : त्रिपुरा राज्याचे १० वे मुख्यमंत्री विप्लव कुमार देव यांचा आजच्या दिवशी जन्म झाला होता.
१९७२ : भारतीय क्रिकेटपटू दीपा मराठे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : अल्फान्सो (बारावा) स्पेनचा राजा (जन्म: २८ नोव्हेंबर १८५७)
१९२२ : पांडुरंग दामोदर गुणे प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक (जन्म: २० मे १८८४ राहुरी, अहमदनगर, महाराष्ट्र)
१९६० : अनंत सदाशिव अळतेकर प्राच्यविद्यापंडित (जन्म: २४ सप्टेंबर १८९८)
१९६२ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (जन्म: ६ जानेवारी १८६८ अकोळनेर, अहमदनगर)
१९७४ : यू. थांट संयुक्त राष्ट्रांचे तिसरे सरचिटणीस (जन्म: २२ जानेवारी १९०९)
१९८४ : यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (जन्म: १२ मार्च १९१३)
१९८७ : परम वीर चक्र सन्मानित भारतीय सैनिक मेजर रामास्वामी पारामेस्वरण यांचे निधन झाले होते.
१९९८ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (जन्म: ४ सप्टेंबर १९१३ गुजरानवाला, पंजाब, पाकिस्तान)
२०१३ : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (जन्म: ५ सप्टेंबर १९२०)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, आणि कोरिओग्राफर सितारा देवी यांचे निधन. (जन्म: ८ नोव्हेंबर १९२०)
२०१६ : क्युबाचे क्रांतिकारक आणि पंतप्रधान फिडेल अलेहांद्रो कॅस्ट्रो रूझ यांचे निधन. (जन्म: १३ ऑगस्ट १९२६)

cmyk







# शिंदेसेनेत अध्यक्ष उमेदवार पदावरून गद्दारी यामुळे पक्ष बदनाम होणार-बाबासाहेब इंगळे

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेच्या अध्यक्षपदाचे उमेदवारीवरून शिंदेसेनेत वाद निर्माण झाले आहे. शिवसेना शिंदे गटाचे सोनाली बालाजी इंगळे यांचा फॉर्म भरण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख पंडित दादा भुतेकर भाऊसाहेब घुगे यांच्या समक्ष फॉर्म भरण्यात आला परंतु सोनाली इंगळे यांना अध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज मागे घ्यावा लागला. पक्षातील काही नेत्यांनी जाणीवपूर्वक नगराध्यक्ष उमेदवारी पासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्यामुळे शिंदेसेनेचे ज्येष्ठ नेते माजी जिल्हा प्रमुख बाबासाहेब इंगळे बोलताना आपले मत व्यक्त केले आहे . असेच ते म्हणाले की मी ४० वर्षापासून पक्षाचे काम करीत आहे माझ्यासोबत अशी गद्दारी व्हायला पाहिजे नव्हती तसेच ते म्हणाले की बाबासाहेब इंगळे यांचाच फॉर्म राहणार असल्याचे आश्वासन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिले होते.




यासंदर्भात मुस्ताकी पटेल हे फोन बंद करून बाहेर कुठेतरी जाणून बुजून निघून गेले यासंदर्भात मी आमदार हिकमत उढाण यांना संपर्क केला त्यांनी माझा कॉल स्वीकारला नाही. यामुळे आमदार उढाण यांच्या सांगण्यावरूनच मुस्ताकी पटेल यांनी फॉर्म मागे घेतला नाही असा माझा सरळ आरोप आहे. फॉर्म परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी तीन वाजता मुस्ताकी पटेल येणे फोन सुरू केला. पक्षाने मला एक नंबरचा फॉर्म देणे गरजेचे होते परंतु पक्षाने एक नंबर फॉर्म मस्तकी पटेलला दिल्यामुळे मला माझा फॉर्म परत घ्यावा लागला व माझ्यासोबत विश्वासघात केला मी अठरा उमेदवार भरण्याची पूर्ण तयारी करून फॉर्म भरले होते. मुस्ताकी पटेल सारखे कार्यकर्ते पक्षात राहिले तर पक्षाची बदनामी होऊन पक्षावर विश्वास राहणार नाही असे पण बाबासाहेब इंगळे म्हणाले. मुस्ताकी पटेल हे आ. उढाण यांचा जवळचा कार्यकर्ता आहे म्हणून हे सगळं कारस्थान आमदार उढाण यांनी केले आहे. नगराध्यक्ष पदासाठी सोनाली इंगळे, सुनीता जेधे, दर्शना खरात, सना अनम पटेल यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली. सर्वांनी उमेदवारी अर्जही भरले होते. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेपर्यंत सनाअनम पटेल, सोनाली इंगळे यांची नावे शेवटच्या क्षणापर्यंत होती. नगर परिषद निवडणुकीत पक्षाच्या हितासाठी पुढाकार घेऊन नेत्यांशी चर्चा केली. बैठक घेतल्या. प्रभाग निहाय उमेदवार निश्चित केले. अध्यक्षपदासाठी इतर इच्छुक उमेदवारांनी आपल्या कुटुंबातील सदस्याच्या उमेदवारीला पाठिंबा देखील दर्शवला होता, म्हणून सोनाली इंगळे यांचा नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. परंतु, पक्षाच्या नेत्यांनी उमेदवारी अर्ज भरत असताना, शेवटच्या क्षणाला दोन क्रमांकाला सोनाली इंगळे यांचे नाव दाखल केले. त्यामुळे सर्व गोंधळ झाला आणि वेळेला नाविलाजाने उमेदवारी अर्ज मागे घ्यावा लागला. असे शेवट बाबासाहेब इंगळे म्हणाले

# देशाला एकात्मतेतून सशक्त व आत्मनिर्भर बनवावे –डॉ. राजेंद्र गाढेकर




जालना । प्रतिनिधी

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित 'युनिटी पदयात्रा' खरपुडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. जिल्हा प्रशासन व मेरा युवा भारत, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने पार्थ सैनिकी स्कूल, खरपुडी येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमामध्ये आमची शाळा, पार्थ सैनिकी स्कुल , एन. सी. सी, विध्यार्थी, शिक्षकांचा, स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेंद्र गाढेकर (जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी, जालना), उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. आपल्या प्रेरणादायी भाषणात डॉ. राजेंद्र गाढेकर म्हणाले, ''देशाला सशक्त आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता ही पहिली गरज आहे. युवकांनी नशेमुक्त भारताच्या निर्मितीत पुढाकार घेऊन समाजपरिवर्तनाची जबाबदारी उचलली पाहिजे. नशामुक्ती, शिक्षणाचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन या विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सर्वांना आत्मनिर्भर भारताची शपथ दिली. यानंतर कलापथका कडुन सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीते आणि पथनाट्याद्वारे सामाजिक जनजागृती केली. विशेषत: नशाविरोधी संदेश देणाऱ्या पथनाट्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून युनिटी पदयात्रेला सुरुवात झाली. पदयात्रेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, परस्पर सहयोग आणि सामाजिक बांधिलकी यांचे संदेश देणारे फलक हातात धरले होते. पदयात्रा मार्ग पार्थ सैनिकी स्कूल क्राईस्ट चर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रायसिंग इंग्लिश स्कूल असा होता. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रणित सांगवीकर (जिल्हा युवा अधिकारी मेरा , राहुल भालेकर प्राचार्य , मोहन नेहरे, सुभेदार ढवळे , बळीराम पाटेकर, जयपाल राठोड, अंकुश खराबे, भगवान पडूळ, सुशील कुमार काकडे, धन्नू बिरसांटा, डॉ. एकनाथ जैन, ज्ञानेश्वर राक्षे, रामेश्वर आनंदे, ऋषिकेश वाघुंडे यांचे विशेष सहकार्य लाभले. आयोजकांनी सर्वांच्या सहभागाबद्दल आभार व्यक्त केले.

# रिक्षा चालकाने पोलिसाच्या अंगावर घातली रिक्षा

छत्रपती संभाजीनगर

गुन्हेगारी वृत्तीच्या एका रिक्षाचालकाने थेट वाहतूक पोलिसाच्या अंगावर रिक्षा घातली. पोलिसाला त्याने सुमारे २० फुटांपर्यंत फरपटत नेले. यात वाहतूक पोलिस अंमलदार तुकाराम टाकसाळे हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना बाबा चौकात घडली.



याप्रकरणी वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युसूफ मोहंमद अली अन्सारी (२७, रा. दौलताबाद) असे रिक्षाचालकाचे नाव असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक सचिन मिरधे यांनी दिली. शहरातील बाबा चौकात छावणी वाहतूक शाखेचे पोलिस कारवाई करीत होते. बाबा चौकाकडून पंचवटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभे असलेले अंमलदार तुकाराम टाकसाळे यांना एक रिक्षाचालक (एमएच-२० ईके ४६३२) विनागणवेश असल्याचे निदर्शनास आले.

त्यांनी त्याला थांबण्याचा इशारा केला, मात्र रिक्षाचालक युसूफ थांबला तर नाहीच उलट भरधाव वेगात टाकसाळे यांच्या अंगावर रिक्षा घातली. त्यामुळे ते रस्त्यावरच कोसळले.

यात टाकसाळे रिक्षाच्या खालच्या बाजूला अडकल्याने रिक्षाचालकाने त्यांना सुमारे २० फुटांपर्यंत फरपटत नेले. यात टाकसाळे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# विश्वासराव जोगलादेवीकर यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील विश्वासराव पंडीतराव जोगलादेवीकर (६९) यांचे २३ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्यावर अंबड येथील हिंदु स्माशनभुमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगी, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. विश्वासराव जोगलादेवीकर हे अंबड तालुक्यात मंडळ अधिकारी म्हणून होते. तसेच ते सेवानिवृत्त मंडळ अधिकारी दिवाकर जोगलादेवीकर यांचे जेष्ठ बंधू होत.



# ट्रॅक्टर-मोटारसायकलच्या भीषण अपघातात पती जागीच ठार; पत्नी गंभीर जखमी

हिंगोली

भरधाव वेगाने, त्यातही चुकीच्या दिशेने येणाऱ्या एका ट्रॅक्टरने मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर हिवरा पाटीजवळ रविवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास एक हृदय हेलावून टाकणारा अपघात घडला. या भीषण दुर्घटनेत मोटरसायकल चालवणारे पती जागीच ठार झाले, तर त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर पांडुरंग डाखोरे (वय २८, रा. चुचा, ता. हादगाव, जि. नांदेड) हे त्यांची पत्नी शालिनी ज्ञानेश्वर डाखोरे (वय २५) यांच्यासह गणपूर कामठा (जि. नांदेड) येथे एका लग्न समारंभासाठी निघाले होते. त्यांच्या सुखाचा प्रवास सुरू असतानाच, हिवरा पाटी परिसरात अचानक चुकीच्या



दिशेने आलेल्या एका ट्रॅक्टरने त्यांच्या मोटरसायकलला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ज्ञानेश्वर डाखोरे यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांची पत्नी शालिनी डाखोरे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना तात्काळ ॲम्बुलन्सद्वारे नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच आखाडा बाळापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बसवंते, चालक प्रविण चव्हाण, तसेच डोंगरकडा पोलिस चौकीचे जमादार संतोष नागरगोजे व विठ्ठल जाधव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह डोंगरकडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवला, जिथे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहसिन खान यांनी शवविच्छेदन केले. ज्ञानेश्वर डाखोरे यांच्या पश्चात एक मुलगी, एक मुलगा, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे. डाखोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, अपघातानंतर ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलीस त्याचा आणि ट्रॅक्टरचा कसून शोध घेत आहेत.

# अपघात टाळण्याच्या प्रयत्नात ट्रक उलटला

परभणी। प्रतिनिधी

समोरून येणाऱ्या कारसोबत होऊ शकणारा अपघात टाळण्याच्या प्रयत्नात लाकूडफाटा भरलेला ट्रक उलटल्याची घटना परभणी तालुक्यातील झरी येथे रविवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. उलटलेल्या ट्रकचा क्रमांक एमएच २६ - बीई ९०१९ असा आहे. हा ट्रक - परभणीतून जिंतूरमार्गे गुजरातकडे लाकूडफाटा घेऊन जात होता.

झरी परिसरातील जिल्हा परिषद प्रशाळा चौकाजवळ समोरून येणाऱ्या कारला वाचवताना ट्रक चालकाचे वाहनावरचे नियंत्रण सुटले आणि ट्रक रस्त्याच्या कडेला उलटला. अपघातानंतर ट्रकमधील लाकूड रस्त्यावर विखुरल्याने काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली. मात्र कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर जखमी नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. ट्रकचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच परभणी ग्रामीण पोलिस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गर्दी नियंत्रणात ठेवत वाहतूक सुरळीत केली. तसेच क्रेनच्या साहाय्याने ट्रक हटविण्याची प्रक्रिया पार पाडली.

# ३०० किलो सिंगल यूज प्लास्टिकचा साठा जप्त

लातूर। प्रतिनिधी

लातूर शहर महानगरपालिकेच्या एका पथकाने गंजगोलाई परिसरातील एका गोडाऊन वर छापा टाकून अंदाजे ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त केला. संबंधितास ५ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला.

सिंगल युज प्लास्टिकच्या वापरास बंदी आहे. असे असतानाही काही लोक प्लास्टिकचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उपायुक्त श्रीमती वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे यांच्या पथकाने छापा मारून ही कारवाई केली. सिंगल यूज प्लास्टिक आरोग्यास हानिकारक आहे. अशा प्लास्टिकच्या



वापरामुळे पर्यावरणाची हानी होते. याशिवाय मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. हे प्लास्टिक गटारी मध्ये अडकून पाणी तुंबते. कचऱ्यातील प्लास्टिक जनावरांनी खाल्ले तर त्यांच्या आरोग्यासाठी ते अपायकारक ठरते. त्यामुळे या प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. व्यावसायिक आणि नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये. यापुढे बंदी असणाऱ्या प्लास्टिकचा वापर केल्याचे आढळले तर ते जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदीप गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

# मेघा कंन्ट्रक्शनला अजून किती बळी पाहिजे

जालना । प्रतिनिधी

मेघा कंट्रक्शन या एजन्सीने केलेल्या कामावर सायंकाळी ८ वाजता सिंगोना पार्टी क्रमांक दोन झोपडपट्टी येथे उसाच्या आयशर व मोटारसायकलचा भीषण अपघात झाला. पांडुरंग अंजीराम कदम (मांगदरे) यांचा जागीच मृत्यू झाला असून इतर दोन जण गंभीर जखमी आहेत. गेल्या चार दिवसांत चौथा अपघात आणि सिंगोना शिवारातील तिसरा मृत्यू नोंदला गेला आहे. म्हणून मेघा कंट्रक्शन मालकाला अजून किती बळी पाहिजे अशी म्हणण्याचे वेळ आली आहे. या सर्व अपघातांना एमएसआरडीसीच्या उपअभियंत्यांचे थेट दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा आरोप आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (-५४८) वर सर्वात गंभीर बाब म्हणजे रस्त्यावरच्या डिव्हायडरवर कोणतेही मार्किंग, रिफ्लेक्टर किंवा चेतावणी चिन्ह नसणे. या भयंकर निष्काळजीपणामुळे उसाने भरलेली आयशर गाडी अंधारात डिव्हायडरवर चढली आणि पलटी झाल्याने हा अपघात घडला. याशिवाय रस्त्यावर खडी, मुरूम पसरलेली, दगडांचे ढिग, अतिक्रमण, तसेच गतिरोधकांचा अभाव, याबाबत वारंवार तक्रारी करूनही उपअभियंत्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले आहे. मेघा कन्स्ट्रक्शन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (हैदराबाद) कडून उपअभियंता नियमित ''हप्ता'' घेत असल्याचे गंभीर आरोपही नागरिकांनी केले असून त्यामुळे ते साइटवर फिरकत नाहीत, पाहणी करत नाहीत,आणि त्याची किंमत सामान्य लोकांना जीव गमावून मोजावी लागत आहे.

म्हणून, उपअभियंत्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, या अपघातप्रकरणी उपअभियंत्यांना सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. -५४८ वरचा हा मृत्यूचा सापळा तात्काळ थांबवला नाही, तर अजून किती जीव जायचे? जनतेचा प्रश्न अनुत्तरितच आहे.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ६६८/२०२५**

**करण वैजिनाथ लोमटे**

**ग्रामपंचायत कार्यालय सफेपुर/गवारी/चौदसवाडी**

पहा

१.करण वैजिनाथ लोमटे रा. गवारी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक करण वैजिनाथ लोमटे यांचा दिनांक ०४/१०/२००७ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय सफेपुर/गवारी/चौदसवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सफेपुर/गवारी/चौदसवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २४/११/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २४/१२/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार, बीड**

# चिमुकलीवर अत्याचारप्रश्नी मानवत कडकडीत बंद

परभणी

नाशिक जिल्ह्यामधील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील ४ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करून तिची निघृण हत्या झाल्याच्या अमानुष घटनेने राज्याला हादरवून टाकले. या घटनेचा मानवतमध्ये निषेध व्यक्त करत कडकडीत बंद पाळला. जनसमुदायाच्या सहभागातून तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढून आरोपीस फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

सराफा, सुवर्णकार संघटनेने दिलेल्या आवाहनाला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत शहरातील किराणा, ज्वेलर्स, कपड्यांची दुकाने, बाजारपेठा, खाद्यपदार्थ विक्रेते तसेच लहान-मोठी प्रतिष्ठाने बंद ठेवली. बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून स्वयंसेवकांनी शिस्तबध्द पध्दतीने रस्त्यांवर कार्यरत राहून जनतेला मार्गदर्शन केले.



शहरातील मुख्य बाजारपेठ, गांधी चौक आणि पालिकेचा परिसर सकाळपासूनच ओस पडला होता. पालिका कार्यालयासमोरून मोर्चाला सुरुवात झाली. हातात फलक, बॅनर व काळे रिबन लावून नागरिकांनी शहरातील मुख्य मागनि शांततेत पण तीव्र भावना व्यक्त करत मोर्चा काढला. चिमुकलीला न्याय मिळाला पाहिजे, आरोपीला तत्काळ फाशी द्या, न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील अशा घोषणांनी शहराचे वातावरण संतापाने भरून गेले. महिला व युवकांचा मोर्चातील सहभाग लक्षवेधी ठरला.

# दरगड हॉस्पीटल व वैष्णवी कचोरी सेंटर या दोघांना दहा हजाराचा दंड

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगर पालिकेच्या आयुक्त तथा जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांनी स्वत: दुपारी जालना शहरात श्रमदानातून . स्वच्छता मोहीम राबवली. या मोहीमेत त्यांना अनेक ठिकाणी नागरीकांना स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आॅले. स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्यामुळे दरगड हॉस्पिटल , वैष्णवी कचोरी सेंटरच्या मालकास १० हजार रूपयांचा दंड ठोठावला. तसेच मित्तल यांनी पाच हजार महानगर पालिका व उज्वील स्मॉल फायनान्स यांच्या वतीने सकाळी शहरात स्वच्छता अभियान राबवतांना दरगड हॉस्पीटल परिसरात रस्त्यावर कचरा जाळल्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ दरगड हॉस्पीटलला पाच हजाराचा दंड ठोठावण्याचा आदेश दिला. दरम्यान, प्रभारी आयुक्त श्रीमती मित्तल यांनीशहरात सुरू केलेल्या स्वच्छता मोहीमेमुळे अनेकांचे धागे दणाणले असून कामचुकार मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचीही पळापळ सुरू झाली आहे. नागरीकांनी मात्र या स्वच्छता मोहीमेला उत्स्फुर्त असा प्रतिसाद दिला आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर बनवण्याचा त्यांचा मानस असून मित्तल यांच्या संकल्पनेतून दर शुक्रवारी शहरात एक तास श्रमदान मोहीम राबवली जात आहे.






# तीन तारखेला मतदाराच म्हणतील 'कसा आहे दणका'

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपालिकेच्या निमित्ताने सध्या बीड शहरांमध्ये प्रचाराचा धुमाकूळ चालू आहे कर्णकर्कश आवाजात रिक्षांमधून सर्वच गल्लीबोळातून प्रचार जोरात सुरु आहे. सभा असली की फटाक्याचाही जोरात दणका चालू आहे. ढोलीबाजा आरडा ओरडा करणारे कार्यकर्ते मतदारांना विचारतात कसा काय दणका. असा सर्व धुमाकूळ सध्या बीड शहरात चालू असून पक्षाच्या उमेदवाराबरोबरच अपक्षांचाही प्रचार जोरात चालू आहे. या निवडणुकीत काही हौसे,नवसे, गवसेही प्रचारात उचलले आहेत. सध्या सर्वच उमेदवाराला आपण निवडून येणार अशी खात्री आहे. तर अनेकांना वार्ड माहित नसले तरी पैशाच्या जोरावर आपण निवडून येऊ अशी खात्री आहे. येत्या दोन डिसेंबरला बीड नगरपालिकेसाठी मतदान होणार असून तीन डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. यावेळी या सर्वच उमेदवारांना मतदाराच म्हणतील आता कसा आहे दणका.**

बीड नगरपालिकेसाठी नगराध्यक्ष पदासाठी तीन प्रमुख पक्षाच्या महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. याबरोबरच इतर पक्षाचे काही उमेदवार आहेत आणि काही अपक्ष उमेदवार ही रिंगणात आहेत. याबरोबरच प्रत्येक वार्डात किमान चार- चार, पाच -पाच उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये प्रमुख पक्षासह अपक्षही आपले नशीब आजमावत आहेत. पक्षाच्या उमेदवाराकडे किमान पक्षाचे काही ठराविक मतदान असते. मात्र अपक्ष निवडणूक लढवताना आपल्याला मतदान पडणार आहे की नाही, आपण लोकांसाठी काय केले या सर्व बाबीचा विचार करून निवडणूक रिंगणात उतरावे लागते. मात्र हल्ली असे होत नाही कुणाच्यातरी फायद्यासाठी किंवा कोणाच्यातरी तोट्यासाठी काही अपक्ष या मैदानात उतरलेले असतात. काही उमेदवारांना रसद पुरवून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले जाते. हे सर्व राजकीय फंडे असले तरी या लोकांची मात्र निवडणुकीत चंगळ असते. नेत्याची सभा असली की फटाक्यांचे जोरदार बार, डीजे, कार्यकर्त्यांचा धिंगाणा अशा गोष्टी चौका चौकात दिसून येतात. उमेदवाराचा प्रचार करतानाही अनेक कार्यकर्ते रस्त्यावर चालणाऱ्या नागरिकांशी अरेरावी करतात. हुज्जत घालतात. ज्यांच्या जीवावर निवडून यायचे त्यांनाच अरेरावी केली तर हे लोक तुम्हाला मतदान कसे करतील? याचा विचार कार्यकर्त्यांना नसतो. उमेदवार त्याचे पाहून घेईल अशा अविर्भावात हे कार्यकर्ते असतात. केवळ उधळणे





आणि टाइमपास करणे अशा पद्धतीने प्रचार चालू असतो. उमेदवाराचा जीव टांगणीला लागला असला तरी काही जवळचे लोक वगळता इतरांना त्याचे जे काही देणे घेणे नसते. प्रमुख पक्षाच्या उमेदवारावर जास्त जबाबदारी असली तरी कार्यकर्ते मात्र उधळल्याशिवाय राहत नाहीत. अशा परिस्थितीत उमेदवार आणि पक्षाचे कार्यकर्ते यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असतो. वरिष्ठ नेते प्रचाराला येणार असले की कार्यकर्त्यांची चंगळ असते. कार्यकर्त्यांना सर्वच रसद पुरवावी लागते. काहीतरी मिळाल्याशिवाय कार्यकर्तेही आता उमेदवाराबरोबर फिरायला तयार नाहीत. त्यामुळे त्यांची संध्याकाळची सोय करावी लागते. या सोयीमध्ये कधीकधी मतदारांना त्रास देण्याचे काम होते. ही बाब मतदारही लक्षात ठेवून ज्या उमेदवाराचे कार्यकर्ते गोंधळ घालतात. त्यांना मतदानातून हात दाखवतात आणि मग मतमोजणी झाल्यानंतर मतदाराच म्हणतात कसा काय दणका! येत्या दोन डिसेंबर रोजी बीड शहरामध्ये मतदान होणार आहे आणि लगेचच तीन तारखेला निकाल लागणार आहे. त्यावेळी मतदाराच म्हणतील आता कसा काय दणका!

## शिरूरकरांनी साहित्य चळवळ जोपासली - प्राचार्य दीपा क्षीरसागर

### सिंदफणा साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

शिरूर कासार । प्रतिनिधी

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या सातव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलन२०२५ च्या बोधचिन्हाचे अनावरण प्राचार्य दीपाताई क्षीरसागर यांचे हस्ते दि. २४ रोजी करण्यात आले.



शिरूर कासार तालुक्यात साहित्य चळवळ सातत्यपूर्ण सुरू आहे. साहित्यिक चळवळ उभी राहिली पाहिजे अशी अपेक्षा प्राचार्य दीपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केली. दि. १६ आणि १७ डिसेंबर रोजी शिरूर कासार येथे होणारे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन पान ३ वर

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील सहा एनसीसीच्या कॅडेट्सची भारतीय सैन्य दलात निवड



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देव स्वागत व सत्कार करण्यात आला. यामध्ये कस्पटे अविनाश खेलबा, रेपे आदित्य सोमेश्वर, नायकोडे सुरज सचिन, डुकरे अभिषेक लक्ष्मण, तोंडे बंडू बप्पा, माने दत्ता सतीश या विद्यार्थ्यांची निवड झाली. राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे अनेक विद्यार्थी यापूर्वी भारतीय सैन्य दलामध्ये भरती झालेले आहेत. या सर्वच विद्यार्थ्यांना एनसीसी विभागप्रमुख उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड कॅडेट्सना वेळोवेळी मार्गदर्शन करत आहेत. धारूर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एनसीसी नोकरीच्या दृष्टीने अधिकाधिक उपयुक्त ठरत आहे. सत्काराप्रसंगी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. अनंथा गाडे, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. लक्ष्मण वैरागे याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गावठी पिस्तूल बाळगून दहशत माजवणाऱ्या इसमावर पोलिसांची कारवाई



बीड । प्रतिनिधी

अवैध गावठी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकामध्ये दहशत माजवणाऱ्या इसमाविरुद्ध तात्काळ कारवाई करून अटक करण्यात आली संदीप ऊर्फ रमेश महादेव झंगोले, वय ३३ वर्षे, रा. बार्शी नाका. अशा या इसमाचे नाव आहे.

दि.२३ नोव्हेंबर रोजी सपोनि मधुसुदन घुगे यांना माहिती मिळाली की, आरोपी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकातील लोकांना धमकावत आहे. त्याने फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने गावठी पिस्तूल डोक्याला लावले व धमक्या दिल्या. माहिती मिळाल्यावर सपोनि मधुसुदन घुगे व पोलीस स्टाफ बीड बायपास येथे गेले आणि त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीच्या ताब्यात एक अवैध गावठी पिस्तुल, एक जिवंत काडतुस आणि स्कॉरपिओ क्र. एम.एच.२३बीबी ५५०५ हे वाहन मिळून आले. यशराज रामा जाधव, वय १९ वर्ष, रा. वायभटवाडी, ता.जि.बीड. यांच्या फिर्यादीवरून पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गु.र.नं. ३३०/२०२५, कलम १०९, ३५२, ३५१ (२) भारतीय न्याय संहिता सह कलम ३/२५ भा.हा. कायदा सह कलम १३५ म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपी सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार. यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोह/८५५ आबुबकर शेख, पोह/२१०७ बांगर, पोशि/२२७३ सादेक पठाण, चा.पोह/१४४८ महेश गर्जे (सर्व पो.स्टे पिंपळनेर). यांनी केली.

भविष्यातही सराईत गुन्हेगारांवर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्काळ कार्यवाही करून त्यांना अटक करण्याचे निर्देश नवनीत काँवत व सचिन पांडकर यांनी दिले आहेत.

## सोळा वर्षीय तरुणाकडून सहा वर्षाच्या बालिकेवर अत्याचार

### शिरूर तालुक्यातील वारणी येथील घटना

शिरूर । प्रतिनिधी

आई-वडील शेतामध्ये गेल्याचा फायदा घेत सोळा वर्षीय तरुणाने सहा वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना शिरूर कासार तालुक्यातील वारणी या गावांमध्ये शुक्रवार दि.७ नोव्हेंबर रोजी घडली आहे. पीडित मुलीच्या फिर्यादीवरून गुरुवार दि.१३ नोव्हेंबर रोजी पोक्सो कायद्याअंतर्गत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार (१६) याच्या विरोधात शिरूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी संभाजी केदार याला पोलिसांकडून अटक ही करण्यात आली आहे.

शिरूर कासार तालुक्यातील वारणी या गावातील पीडित मुलीचे आई -वडील घरातील बाजार संपला म्हणून शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर रोजी बाजाराचे सामान आणण्यासाठी शिरूरमध्ये आले होते. यावेळी त्यांचा सतरा वर्षीय मुलगा सुरज शेतामध्ये कापूस वेचणी करण्यासाठी गेला होता,तर सहा वर्षाची पहिलीच्या वर्गात शिकत असलेली चिमुकली मुलगी शाळेमध्ये सकाळी १० वाजता गेली होती. दुपारी १:३० वाजता शिरूर येथून बाजार करून आलेले आई-वडील पुन्हा शेतामध्ये कापूस वेचणीसाठी गेले होते. पीडित मुलीच्या आजीजवळ आई वडिलांने जेवण डब्बा ठेवून आजीला ४:३० वाजता मुलगी घरी येईल तिला जेवण द्या व तिच्याकडे लक्ष द्या असे सांगून आई वडील कामासाठी शेताकडे गेली होती. आई वडील घरी नसल्याचा फायदा घेत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार (१६) याने आई वडील घरी नसल्याचा फायदा घेत या चिमुर्डीला उचलून नेवून रिकाम्या पाण्याच्या हौदा मध्ये लैंगिक अत्याचार करून त्या ठिकाणहून पळ काढला होता. सायंकाळी ७ वाजता आई -वडील घरी आल्यानंतर त्या चिमुरडीने सर्व हकीगत रडत रडत आपल्या आईला सांगितली. परंतु या घटनेबद्दल पान ३ वर

## कड्यात बालिकेवरील अत्याचारप्रकरणी संतापाची लाट ;निषेध रॅलीत आरोपीला फाशीची मागणी



कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथे बालिकेवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेने परिसर संतप्त झाला आहे.या घृणास्पद कृत्याच्या निषेधार्थ आज कड्यात भव्य रॅली काढण्यात आली.विविध सामाजिक संघटना,स्थानिक नागरिक,व्यावसायिक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होते.

रॅलीची सुरुवात शहरातील आंबेडकर चौकातून झाली व मुख्य रस्त्याने मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात समारोप करण्यात आला.या निषेध रॅलीत विद्यार्थ्यांनी''न्याय द्या!, ''पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे!,''अत्याचाऱ्यांना फाशी द्या!''अशा प्रखर घोषणा देत परिसर दणाणून सोडला. स्थानिक नेते,सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी या प्रसंगी सरकार आणि न्यायव्यवस्थेकडे त्वरित तपास, पान ३ वर

## बैठकीत निर्णय : शहरातील आंबेडकरी समाज तुतारीच्या मागे

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापितांना व अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी आज रोजी हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे बीड शहरातील आंबेडकरवादी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक घेऊन स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्णय घेण्यात आला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जोपासत समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून



लढा उभा करण्याचे काम करणाऱ्या दलित चळवळीतील पदाधिकाऱ्यांना उमेदवारी डावलून समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या व आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी जाहीर करून ४० वर्षानंतर आम्हाला मिळालेली राजकीय संधी हिरावून घेऊन मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याचे काम अजित पवार यांनी केले आहे.

आंबेडकरी समाज बांधवांच्या बैठकीत पप्पू कागदे, अजिंक्य चांदणे, बबन वडमारे,राहुल मस्के, वसंतराव ओगले, दिनकर बोराडे,अरुण सवाई, ज्ञानोबा माने, दीपक चौगुले, नितीन सोनवणे, उत्तमराव पवार, सत्यनारायण ढाका, अनुरथ वीर, मायाताई मिसळे, आम्रपाली साबळे, भगवान कांडेकर, सिद्धार्थ शिंनगारे, नितीन वाघमारे, यांच्यासह आंबेडकरी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी स्मिता विष्णू वाघमारे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. बीड नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक समाज बांधवांच्या स्वाभिमानाची निवडणूक असून मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असलेल्या नगर अध्यक्षपदासाठी अनुसूचित जातीच्या समाजाच्या जागेवर आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन भू-मापिया, रेती माफिया व गुटखा माफिया यांच्या ताब्यात बीड नगर परिषद देण्यासाठी व आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरक्षणाच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम करणाऱ्या अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या निर्णयाला नेस्तनाबूत करण्यासाठी समाजाची एकजूट महत्वाची आहे. बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज बांधवांनी राजकीय ताकद निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हाच्या उमेदवाराला पराभूत करून, स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांनी बैठकीत निर्णय घेवून केला.

### भाजपची बी टीम राष्ट्रवादी कॉँग्रेस अजीत पवार पक्ष -समीर साजीद बिल्डर

## खासदार, आमदार आम्ही निवडून दिले -ॲड. शेख शफीक

बीड । प्रतिनिधी

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाने बीड महानगरपालिका निवडणुकीसाठी जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह सर्व १९ नगरसेवक उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर ,ॲड शेख शफीक भाऊ, नगरसेवक शेख मतीन, खन्ना भैय्या, शिवाजी



भोसकर,अजहर मोमीन, सलाम सेठ, इलियास भाया, सोफीयान मणियार सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. रविवारी बीड शहरातील विविध भागांत कॉर्नर सभा व पदयात्रांचे आयोजन करण्यात आले होते. यात पक्षाचे प्रमुख चेहरे ॲड. शेख शफिक भाऊ यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना भाजपची बी टीम म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट)वर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, ''भाजपची बी टीम म्हणजे राष्ट्रवादी अजित पवार पक्ष आहे. बीडच्या जनतेला ही खरी ओळख आता समजली आहे. त्यामुळे यावेळी एमआयएमला भरघोस मतदान करा आणि नगराध्यक्षपदासह सर्व नगरसेवक उमेदवारांना निवडून द्या. याच प्रचार सभेत पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा बिल्डर समीर साजीद यांचे विशेष कौतुक करण्यात आले. पाय फ्रॅक्चर असूनही समीर साजीद यांनी प्रचारासाठी पदयात्रा काढली

## अमर नाईकवाडे यांचा आक्षेप न्यायालयाने फेटाळला, अमृतकाका सारडा यांना न्याय


बीड । प्रतिनिधी

पेठ बीडच्या विकासासाठी ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या अमृत काका सारडा यांच्या उमेदवारीला जिल्हा न्यायालयाने कायदेशीर मान्यता देत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवारी कायम ठेवण्याचा जो निर्णय दिला होता, त्यावर दाखल झालेल्या अपीलवर मा. न्यायमूर्ती एस. आर. शिंदे मॅडम यांच्या कोर्टाने सुनावणी केली आणि त्यानंतर उमेदवारी कायम ठेवण्याचा आदेश देत अमृत काका सारडा यांच्या बाजूने निकाल दिला.

निवडणूक प्रक्रियेतील आवश्यक कागदपत्रांची तपासणी आणि सादर करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या आधारे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की उमेदवारी निवडणूक नियम आणि कायद्यानुसार वैध आहे.

या सुनावणीदरम्यान ॲड. बालाप्रसाद जाजू यांनी कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडली.

याचप्रमाणे २०१६ सालीही अमर नाईकवाडे यांनी याच पद्धतीने कैलास बीयानी यांच्यावर तक्रार केली होती, मात्र तेव्हाही त्यांची याचिका फेटाळली गेली होती.२०१६ मधील प्रकरणातील न्यायालयीन नोंदींचाही या प्रक्रियेत संदर्भ पान ३ वर



### पेठ बीडच्या विकासासाठी दृढ संकल्प

अमृत काका सारडा यांनी पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून अनेक वर्षे सातत्याने काम केले असून त्याममध्ये पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक सहाय्य आणि नागरिकांच्या गरजांशी निगडित सेवा या क्षेत्रांत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# उमरटीतून ५०० गावठी कट्टे पुण्यात! गावठी शस्त्रं आणि गुन्हेगारांच भयावह कनेक्शन; पोलिसांचा मोठा खुलासा

**पुणे । प्रतिनिधी**

मध्य प्रदेशातील उमरटी गावातून मागील पाच वर्षांत पुणे शहरात तब्बल पाचशे गावठी कट्टे विकण्यात आले आहेत. या कट्ट्यांचा वापर गुन्हेगारी कारवायांसाठी केला आहे. यामुळे हे कट्टे ज्या ज्या गुन्हेगारी कारवायांत वापरले, त्यामध्ये संबंधित विक्रेत्यांनाही आरोपी केले जाणार आहे. इतकेच नव्हे, तर शनिवारी उमरटीतील कारवाईत अटक केलेल्यांना मोक्काच्या कक्षेत घेण्यात येणार आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते उमरटीतील कारवाईत सहभागी झालेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा रविवारी पोलीस आयुक्तालयात सत्कार केला. या वळी सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) संजय पाटील, उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, उपायुक्त सोमय मुंडे, उपायुक्त कृषिकेश रावळे आदी उपस्थित होते.

या वेळी सांगण्यात आले, की कुख्यात गुंड शरद मोहोळच्या गुन्ह्यात वापरलेला



गावठी कट्टा हा मेड सन उमरटी असल्याचे सर्वप्रथम निदर्शनास आले. त्यानंतरच्या कारवायांमध्ये मेड इन उमरटीचेच कट्टे सापडत होते. नुकत्याच चतुश्रृंगी पोलिसांत दाखल झालेल्या एका गुन्ह्यात एका राजकीय कार्यकर्त्याकडे गावठी कट्टा सापडला होता. तोही उमरटीतून खरेदी केला होता. थोडक्यात पुण्यात कट्टा संस्कृती रुजण्यास उमरटी गावाचा मोठा हात आहे.

उमरटी नावाची दोन गावे मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या बॉर्डरवर आहेत. राजे रजवाड्यांच्या काळात या दोन्ही गावांत शस्त्रे तयार केली जात होती. ही शस्त्रे राजे रजवाड्यांसाठी, तसेच युद्धासाठी तयार केली जात होती. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात असलेल्या उमरटीतील पुढील पिढी शिकून कामधंद्याला लागली. मात्र, मध्य प्रदेशातील उमरटीतील नगरिकांनी त्यांचा पारंपरिक शस्त्र बनविण्याचा धंदा सोडला नाही. आता ते गुन्हेगारांना शस्त्र विकत आहेत.

येथे मध्य प्रदेशातील पोलीसही वारंवार छापे टाकतात; परंतु नागरिक हा व्यवसाय सोडायला तयार नाहीत. तेथे इतर राज्यातील पोलीस आल्यावर त्यांच्यावर हल्ला केला जातो. नुकतेच जळगाव पोलिसांचे एक पथक कारवाईला गेले असता, एका पोलीस उपनिरीक्षकास डांबून ठेवण्यात आले होते. पकडलेले आरोपी सोडल्यावर त्याची सुटका करण्यात आली. यामुळे पुणे पोलिसांनी सोबत शीघ्र कृती दल, दंगल नियंत्रण पथकही सोबत नेले होते.

गरज पडल्यास पुन्हा उमरटीत घुसू – अमितेश कुमार

उमरटीतील शस्त्र बनविण्याचे साहित्य पथकाने नेस्तनाबूत केले आहे. यामुळे तेथे पुन्हा लवकर शस्त्रनिर्मिती होणार नाही. मात्र, पुन्हा तेथून पुणे शहरात शस्त्रे दाखल झाल्यास उमरटी गावात पुणे पोलिसांचे पथक घुसेल, असा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# तब्बल १० हजार रक्तपिशव्यांचे महाअभियानात संकलन; मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली कृतज्ञता



पुणे । प्रतिनिधी

शहरात रक्ताचा तुटवडा गंभीर होत असताना, पुणेकरांनी पुन्हा एकदा सामाजिक उत्तरदायित्वाच्या उच्च परंपरेचे जतन करीत, खासदार आणि केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान महाअभियानात ५६ रक्तदान शिबिरांमधून तब्बल १० हजार ३३८ रक्तपिशव्यांचे विक्रमी संकलन केले. दरवर्षी होणाऱ्या या उपक्रमाला पुणेकरांनी दिलेल्या अभूतपूर्व प्रतिसादाबद्दल मोहोळ यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

मोहोळ म्हणाले, पुणेकरांच्या प्रेमाने मी भारावून गेलो आहे. समाजाच्या सर्व स्तरातील नागरिकांचा सहभाग लाभला. हा विश्वास माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. शहराने पुन्हा एकदा दाखवून दिले की ऐक्य, सहकार्य आणि सामाजिक संवेदनशीलता हीच त्याची खरी ओळख आहे. हजारो पुणेकरांनी घराबाहेर पडून केलेले रक्तदान, हे केवळ वाढदिवसाचे औचित्य नव्हते, तर समाजबंध दृढ करण्याचे प्रतीक होते. मी पुणेकरांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. पुणेकरांनी दाखवलेले प्रेम म्हणजेच माझी खरी ताकद आहे.


मोहोळ पुढे म्हणाले, वर्षभरात आपत्कालीन प्रसंगी तत्काळ रक्त उपलब्ध करता यावे यासाठी स्वेच्छेने रक्तदान करण्यास सदैव तयार असलेल्या पुणेकरांची सूची तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. या यादीमध्ये विशेषतः दुर्मिळ रक्तगटाचे दाते समाविष्ट केले जातील, ज्याचा थेट लाभ गरजू रुग्णांना मिळू शकेल.

रक्तदाते आणि रुग्ण यांच्यासाठी एक विशेष ऑनलाईन पोर्टल विकसित करीत आहोत. या पोर्टलवर रक्त देण्यास इच्छुक दाते नोंदणी करू शकतील. गरज पडल्यास रुग्ण किंवा रुग्णालयांना याच प्लॅटफॉर्मवरून थेट संपर्क साधता येईल. यामुळे रक्त मिळवण्यासाठी दवाखान्यांमध्ये किंवा सोशल मीडियावर धावाधाव करावी लागणार नाही. असे मोहोळ यांनी सांगितले.

# मावळचा आमदार आमचा नसला तरी त्याचा बाप मुख्यमंत्री आमचा; चित्रा वाघ यांच्या समोर महिला नेत्याचं बेताल वक्तव्य

पुणे । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा रंग जसजसा रंगत चालला आहे तसतसे राजकीय नेत्यांचे वक्तव्यही बेताल होत चालल्याचं दिसतंय. कुणी काय बोलून समोरच्या उमेदवारावर टीका करेल याचा काही नेम राहिला नाही. तसाच काहीसा प्रकार लोणावळयात (ङेपर्रींरश्रर एश्रशलींळेप) घडल्याचं दिसून आलं. भाजपच्या एका स्थानिक महिला नेत्याने अजितदादांच्या आमदारावर टीका करताना त्याचा बाप काढला. माळवचा आमदार आपला नसला तरी त्याचा बाप, मुख्यमंत्री आपला आहे असं वक्तव्य त्या महिलेने केलं. सुरेखा जाधव (डीशज्ञहर गरवहर्रीं) असं भाजपच्या महिला नेत्याचं नाव



असून त्यांनी चित्रा वाघ (उहळींर थरसह) यांच्या समोरच आमदार सुनील शेळकेंवर टीका केली.

लोणावळा नगरपरिषद निवडणूक चांगलीच रंगात आली असून भाजप प्रचारसभेत भाजपच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव यांच्या वादग्रस्त विधानामुळे राजकीय खळबळ उडाली. आमदार सुनील शेळके यांचे नाव न घेता त्यांनी बेताल वक्तव्य केलं. भाजपच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव म्हणाल्या की, कमळाशिवाय काही पर्यायच नाही. गल्ली ते दिल्ली सगळीकडे भाजपच आहे. जरी इथला आमदार आमचा नसेल तरी त्याचा बाप आमचा आहे, मुख्यमंत्री आमचा आहे. त्यामुळे सगळीकडे कमळ फुलवा.


विशेष म्हणजे भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांच्यासमोरच सुरेखा जाधव यांनी हे वक्तव्य केलं. त्यावरुन आता नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे. आमदार सुनील शेळके यांच्यावर एकेरी भाषेतील टीकेलाही विरोध होत आहे. मात्र, यापूर्वी आमदार सुनील शेळके यांनीही सुरेखा जाधव यांच्यावर एकेरी भाषेत टीका केल्याची चर्चा आहे.लोणावळ्यात राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाल्याचं दिसून येतंय. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युतीचे संकेत दिल्याची चर्चा असताना, लोणावळा भाजपने स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. आश्चर्याची बाब म्हणजे भाजपच्या कमळ चिन्हावरील काही उमेदवारांनीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना उघडपणे पाठिंबा दिल्याचे समोर आलं आहे.

# औंधमध्ये बिबट्याचे दर्शन; वनविभागाकडून शोधमोहीम सुरू

पुणे । प्रतिनिधी

औंध परिसरातील रहिवाशांना पहाटेच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. आरबीआय कॉलनी आणि सिंध सोसायटीच्या आसपास हा बिबट्या फिरताना दिसल्याची माहिती नागरिकांनी दिली. ही माहिती देताच पुणे वन विभाग तातडीने सतर्क झाला. बिबट्याचा मागोवा घेण्यासाठी सर्व तांत्रिक साधनांचा वापर सुरू असून, पथके पूर्ण तयारीत आहेत. बिबट्या दिसल्यास त्याला पकडण्यासाठी सापळे आणि आवश्यक उपकरणांसह सर्व व्यवस्था करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, रात्री सर्व वन विभागाचे कर्मचारी व रेस्क्यू टीम



यांनी विविध संशयित भागात थर्मल ड्रोनच्या मदतीने, तसेच पायी आणि वाहनांद्वारे गस्त घालून शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, अद्याप तरी कोणत्याही कॅमेऱ्यात संबंधित बिबट्या दिसून आलेला नाही तसेच त्याचे पायाचे ठसे आढळून आलेले नाहीत. काल पहाटे ४ नंतर तो बिबट्या कोठेही प्रत्यक्षदर्शी किंवा पुराव्यासहित दिसले नसल्याची माहिती देण्यात आली आहे. तरी देखील नागरिकांनी सतर्क राहावे, परंतु अनावश्यक भीती बाळगू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, काही नागरिक कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या मदतीने बनावट फोटो तयार करून समाजात अफवा पसरवून भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा प्रकारे खोटी व दिशाभूल करणारी माहिती, फोटो किंवा मेसेज सोशल मीडियाद्वारे पसरवू नयेत. अन्यथा त्यांच्यावर विद्यमान शासकीय नियमावली व कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे वनविभागाकडून सांगण्यात आले आहे. सध्या वन विभाग व रेस्क्यू टीम परिस्थितीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी केवळ अधिकृत स्त्रोतांकडूनच माहिती घ्यावी, तसेच कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा माहिती तात्काळ १९२६ या हेल्पलाइन क्रमांकावर कळवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# दुचाकीस्वार गेला अन् बिबट्या आला; अवसरी खुर्दमध्ये काळजाचा ठोका चुकवणारी घटना

मंचर । प्रतिनिधी

अवसरी खुर्द (ता.आंबेगाव) येथील भोरमळ्यामध्ये हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभा उजव्या कालव्यावरून शनिवार, दि.२२ रोजी रात्री ११.३० वाजता जात असताना शेतकरी सोमनाथ भोर यांच्या चारचाकी वाहनासमोर अचानक बिबट्या आडवा गेला.चारचाकी गाडीमुळे शेतकरी थोडक्यात वाचला. काही क्षणांपूर्वीच एक दुचाकीस्वार त्या ठिकाणाहून निघून गेल्याने मोठा अनर्थ टाळला.



शेतकरी सोमनाथ भोर हे आपले दैनंदिन काम संपवून घरी जात असताना त्यांच्या चारचाकी वाहनासमोर अचानक बिबट्याला आला. प्रसंगावधान राखून त्यांनी चारचाकी गाडीच्या काचा बंद केल्या. त्यानंतर त्यांनी मोबाईलमध्ये बिबट्याचे छायाचित्र काढले. बिबट्या पूर्व बाजूच्या झाडीमध्ये सावकाश निघून गेल्याचे शेतकरी सोमनाथ भोर यांनी सांगितले.माजी ग्रामपंचायत सदस्य विकास भोर म्हणाले, पूर्व भागातील घोडनदी तसेच डिंभा उजवा-डावा कालवा असल्यामुळे या भागात बागायती शेती मोठ्या प्रमाणावर आहे. उसाचे विस्तीर्ण क्षेत्र असल्याने येथे बिबट्यांचे वास्तव्य वाढले असून ते रात्रीच्या वेळी वारंवार दिसून येतात.अवसरी वन उद्यान आणि वनविभाग कार्यालय जवळ असल्याने या भागात वन्यप्राण्यांची वर्दळ कायम असते.अचानक झालेल्या या बिबट्याच्या साक्षात्काराने नागरिक भयभीत झाले असून, या ठिकाणी तातडीने पिंजरा लावून संबंधित बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी त्यांनी वनविभागाकडे केली.

# चोरट्यांनी थेट महापालिकेचे पथदिवे आणि खांबच पळवले

**पुणे । प्रतिनिधी**

बिबवेवाडी भागात सुशोभीकरणासाठी ठेवलेले पथदिवे, तसेच खांब चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. संत एकनाथनगर भागात ही घटना घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.याप्रकरणी पुणे महापालिकेच्या बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील अभियंता शिवानंद अंकोलीकर (वय ४५) यांनी बिबवेवाडी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबवेवाडीतील पुष्पमंगल कार्यालय ते संत एकनाथनगर परिसरात सुशोभीकरणासाठी पथदिवे बसविण्याचे काम सुरू असल्याने पदपथावर खांब आणि दिवे ठेवले होते. चोरट्यांनी पथदिवे आणि खांब असा दोन लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

पथदिवे आणि खांब चोरीला गेल्याचे उघडकीस आल्यानंतर महापालिकेकडून तक्रार देण्यात आली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते यांनी घटनास्थळी भेट दिली. चोरट्यांचा शोध सुरू असून, पोलिसांनी बिबवेवाडीतील स्वामी विवेकानंदर रस्ता परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. पोलीस उपनिरीक्षक माने तपास करत आहेत.

# नियतीचा क्रूर खेळ! भावाच्या पाठोपाठ बहिणीनेही सोडला जीव

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नरमधील जुना बस स्थानकासमोरील ईदगाह मैदानालगत असणाऱ्या एका शेततळ्यात बुडून बहीण - भावाचा शनिवारी (दि. २२) रात्री मृत्यू झाला.आफान अफसर इनामदार (वय १०) व रिफद अफसर इनामदार (वय ७, दोघे रा. खडकवस्ती, जुन्नर) अशी या मृतांची नावे आहेत. शनिवारी दुपारी चारपासून ते घरात नसल्याचे त्यांच्या आईच्या लक्षात आले. परिसरात शोधाशोध करूनही ते न सापडल्याने जुन्नर पोलिसांना माहिती देण्यात आली.



ज्या ठिकाणी ही मुले नेहमी खेळायला जायची, त्या परिसरात जुन्नर पोलीस, वन विभाग आणि जुन्नर रेस्क्यू टीमने ड्रोनच्या मदतीने शोध घेतला. तेथे असलेल्या एका शेततळ्याच्या काठावर मुलांचे चप्पल-बूट आणि घसरल्याच्या खुणा दिसल्या. त्यानंतर शेततळ्यात बघितले असता रात्री उशिरा या दोघांचे मृतदेह सापडले. जुन्नर ग्रामीण रुग्णालयाच्या तपासणीत त्यांचा पाण्यात बुडून चार तासांपूर्वी मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

या मुलांचे वडील वेल्डिंगचा व्यवसाय करत असून, ते काही महिन्यांपूर्वी नोकरीसाठी दुबईला गेले आहेत. एका सर्वसामान्य कुटुंबावर कोसळलेल्या या संकटामुळे हळहळ व्यक्त होत आहे. पोलीस निरीक्षक किरण अवचर, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण आणि रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी मृतदेह पाण्याबाहेर काढले. जुन्नर पोलीस पुढील तपास करत आहेत.

# शिरूर-आंबेगाव-खेड-जुन्नर परिसरातील शाळांच्या वेळेत बदल

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर-आंबेगाव-खेड-जुन्नर या अतिसंवेदनशिल बिबटप्रवण क्षेत्रातील बिबट्याच्या मानवी हल्ला प्रकरणी वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शासन आदेशानुसार बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांच्या वेळात बदल करून सदरची वेळ आता सकाळी ९:३० ते दुपारी ४:०० अशी निश्चित करण्यात आली आहे.

बिबट्यांचा वावर असलेल्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना म्हणून बिबट्याप्रवण क्षेत्रातील शाळांच्या वेळेतील हे बदल संबंधित मुख्याध्यापक यांनी शाळा व्यवस्थापन समिती तथा शाळा समितीची मंजूरी घेवून करण्याचे आदेश पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून जारी करण्यात आले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी जुन्नर बिबट प्रवण क्षेत्रातील शिरूर, आंबेगाव, जुन्नर, खेड या तालुक्यातील बिबट्याच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बिबट प्रवण क्षेत्रात असलेल्या शाळेतील विद्यार्थी सुरक्षितता संबंधित उपाययोजना करण्याबाबत संबंधित पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना परिपत्रक काढून शाळांना सुचित करण्याचे निर्देश दिले आहेत.

पुणे जिल्ह्यात सर्व माध्यमाच्या व सर्व



व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा जरी एक किलोमीटर व उच्च प्राथमिक शिक्षणाची सुविधा तीन किलोमीटर अंतराच्या आत उपलब्ध असली तरी बहुतांश विद्यार्थी पायी शाळेत ये जा करातात. रस्त्याच्या कडेने बिबट प्रवण आपत्ती क्षेत्र, ऊस क्षेत्र, जंगल क्षेत्र, डोंगराळ क्षेत्र अनेक ठिकाणी आहेत. सध्या ऊसतोडीमुळे उसाचे क्षेत्र कमी होत असल्याने बिबट्यांचे हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच सद्यस्थितीत हिवाळा ऋतूमुळे संध्याकाळी लवकर अंधार पडत असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. बिबटयांच्या हल्लयामुळे एकही विद्यार्थी क्षतीग्रस्त होऊ नये, विद्यार्थी संध्याकाळी अंधरापूर्वी तसेच रस्त्यावर रहदारी असतानाच घरी पोहचणे आवश्यक आहे. यासाठी बिबट प्रवण आपत्ती क्षेत्रातील शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४.०० असा बदल शाळा व्यवस्थापन समिती / शाळा समितीची मंजूरी घेवून करण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

सर्व बिबट प्रणव आपत्ती क्षेत्रातील शाळेच्या तसेच याव्यतिरिक्त बिबट्याचा वावर असणा-या शाळांच्या मुख्याध्यापकांच्या निर्दशनास आणून द्यावी. तसेच पुणे जिल्हयातील सर्वच शाळास्तरावर सकाळच्या परिपाठात सुरक्षिततेबाबत सर्व विद्यार्थ्याचे तात्काळ उद्बोधन करण्यात यावे. शाळास्तरावर पालक मेळावे घेऊन शाळेत येताना व शाळा सुटताना पाल्यांना स्वतः घेऊन जाणेबाबत पालकांना अवगत करावे.

प्रत्येक विद्यार्थी सुरक्षित घरी पोहोचल्याची वर्गशिक्षकांनी खात्री करणे आवश्यक आहे. तसेच शालेय स्तरावरील विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीच्या सभा दरमहा घेवून विध्यार्थी सुरक्षेच्या अधिकच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी.असे निर्देश बिबट प्रवण क्षेत्रातील गटशिक्षणाधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिले आहेत.

# दाभाडेमळा शाळेजवळ बिबट मादीसह ३ बछडे; विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथील दाभाडेमळा परिसरात बिबट्यांचा वावर वाढला आहे.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळील उसाच्या शेतात शुक्रवारी (दि. २१) दुपारी एका बिबट मादीसह तिचे तीन बछडे दिसल्याने परिसरातील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये मोठी घबराट पसरली आहे. शाळेजवळच बिबट्यांचा वावर असल्यामुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

शेतकरी दामोदर दाभाडे यांनी सांगितले की, बटाटा पिकाच्या शेतात पाणी सोडत असताना त्यांना उसाच्या शेताच्या बाजूला बिबट मादीसह बछडे दिसली. त्यावेळी मजुरांसह शेतात काम करणाऱ्या इतर व्यक्तींमध्ये भीती पसरली. त्यानंतर शाळेपासून काही अंतरावर शेतकरी अंकुश महादू दाभाडे हे उसाच्या शेताला पाणी देण्यासाठी गेले असता, लपून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक डरकाळी फोडली. भयभीत झालेल्या दाभाडेंनी प्रसंगावधान राखत स्वतःला वाचवत तेथून ते बाहेर पडले.

बिबट मादीसह बछड्यांमुळे परिसरात धोका निर्माण झाला आहे. नागरिकांचे, विशेषत: लहान मुलांचे बाहेर फिरणे अवघड बनले आहे. घटनास्थळी वनरक्षक लहू केसकर यांनी पाहणी केली असून दोन्ही ठिकाणी तत्काळ पिंजरे लावण्यात आले आहेत. ग्रामस्थांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन वन विभागाकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दाभाडेमळा शाळेच्या परिसरात तीन बछड्यांसह बिबट मादीचे दर्शन झाल्याची बातमी पसरताच गावातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी पालकांना आवाहन केले आहे की, शाळेत ये-जा करताना विशेष काळजी घ्यावी. तसेच, घरी जाताना मुलांनी एकट्याने न येता एकत्र येण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.